# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

विश्व हिन्दू परिषद

धर्मो रक्षति रक्षितः

■ शके १९४८ ■ वर्ष २६ ■ अंक ०२ ■ मे २०२६ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या ३६

■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 26 ■ ISSUE NO 02 ■ May 2026 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 36




तुमच्या वेगवान स्वप्नाला आमचं पाठबळ !
जनता
वाहनकर्ज
योजना
कमर्शियल वापराचे चारचाकी तसेच वैयक्तिक वापराचे चारचाकी / दुचाकी वाहन (इलेक्ट्रिक सह) इत्यादीसाठी कर्ज
*अटी व नियम लागू
आकर्षक व्याजदर । सुलभ प्रक्रिया । त्वरित कर्जवितरण
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. दूरध्वनी : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.jsblpune.bank.in

मासिक
**हिंदुबोध**
वर्ष – सव्वीसावे : अंक २ रा
शके १९४८
मे २०२६

संपादक
श्री. रविकांत कळंबकर
ravi.kalambkar@gmail.com

निवास
एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध

संपादक मंडळ
श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार–प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार–प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

संपादक मंडळ सदस्य
श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार
व्यवस्थापक
मनोज शेलार
मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/–, वार्षिक वर्गणी रु. २००/–

मुद्रण स्थळ
संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... जिहाद : एक विस्तारवादी अ–धर्मयुद्ध
श्री. श्रीपाद श्रीकांत रामदासी .................... ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त .................... ०७

✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले .................... १५

✦ प्रयत्न का प्रारब्ध
डॉ. संजीव दाते .................... १८

✦ हुतात्मा दिन संकल्पना
अविनाश हळबे .................... २१

✦ आण्विक पाणबुडी – SSBM S4*
काशीनाथ देवधर .................... २४

✦ संस्कार/नैतिक मूल्य शिक्षा कक्षाएँ :
आधुनिक शिक्षा की कमी का समाधान
माधवी सौंशी .................... २६

✦ बुद्ध पौर्णिमा : शांतता, समता आणि मानवतेचा संदेश!
ॲड. स्वाती जेरे .................... २८

✦ श्रीगुरू नानकदेव चरित्र आणि तत्त्वज्ञान
अविनाश हळबे .................... ३०

✦ लघु कथा : तो नक्की आहे का?
श्रीपाद श्रीकांत रामदासी.................... ३३

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्ट्नुसार संपादकीय जबाबदारी)

**"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## ।। गाथा महाराष्ट्राची ।।

उठा उठा हो मरहट्ट्यानो, सांगतो गाथा महाराष्ट्राची
गाथा सांगतो जन्मभूमीची, धर्मभूमी अन पुण्यभूमीची ।।धृ ।।
असे जन्मभू ही वीरांची, असे कर्मभू ही संतांची
असे मायभू ही वाघांची, असे जन्मभू ही छाव्यांची ।। १ ।।
असे भूमी ही गुणवंताची, असे भूमी ही कलावंतांची
असे भूमी ही नितीवंतांची, असे भूमी ही कीर्तिवंतांची ।। २ ।।
जन्मभूमीही सत्यशोधकांची, जननी ही सुधारकांची
उत्पत्ती येथेच हिंदुत्वाची, हीच जन्मभू चळवळींची ।। ३ ।।
जन्मभूमीही अभिनेत्यांची, कर्मभूमीही लोकनेत्यांची
जन्मभूमीही खेळाडूंची, कर्मभूमीही साहित्यिकांची ।। ४ ।।
या भूमीनेच रचली मेढ स्वातंत्र्याची
शिव शंभूंनी लाज राखली सदैव धर्माची ।। ५ ।।
या भूमीनेच लाज राखली ती बुदेल्यांची
त्वरे धावले वायुवेगे ते राव बाजी ।। ६ ।।
हिमालयाला साथ झाली केवळ सह्याद्रीची
नका विसरू आठवण ती पानिपताची ।। ७ ।।
सह्याद्रीचे सिंह आम्ही, भीती ना कोणाची
उंच आभाळी सदा फडकवू, ध्वजा धर्माची ।। ८ ।।
संस्कृती येथे वारकऱ्यांची, परी परंपरा ही धारकऱ्यांची
भल्यासी देऊ लंगोट कासेची, परी फितुरांसी शिक्षा चौरंग्याची ।। ९ ।।
गाथा ऐसी महाराष्ट्राची, शिव शंभूंच्या राज्याची
गाथा असे ही सहकार महर्षी अन शिक्षण महर्षींची ।। १० ।।
आता सांगतो ऐका श्रोते, व्यथा सह्याद्रीची
रेवा, भीमा, कृष्णा अन कोयनेच्या तीरांची ।। ११ ।।
पूर्वज लढले एकदिलाने, राखण्या लाज राष्ट्राची
नका करू हो माती आता, इथल्या ऐक्याची ।। १२ ।।
नका वाढवू विषवल्ली ती, जाती अन वर्णाची
वज्रमूठ ही आता बांधू, अठरा पगड्यांची ।। १३ ।।

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

**श्री. रविकांत कळंबकर**
(संपादक)

**श्री. किशोर चव्हाण**
(प्रांत मंत्री)

**श्री. पांडुरंग राऊत**
(प्रांत अध्यक्ष)

# जिहाद : एक विस्तारवादी अ-धर्मयुद्ध

**संपादकीय**

मागील महिना हा अनेक घटनांचा साक्षीदार होता. त्यातील एक लक्षवेधी आणि म्हणूनच महत्वाची घटना म्हणजे नासिक येथील टाटा कंसल्टंसी सर्विसेस या कंपनी मधील धर्मांतरण आणि लैंगिक शोषण हे प्रकरण.

एका बहुराष्ट्रीय आणि टाटा यांच्या नावामुळे देशासाठी गौरव असणाऱ्या आस्थापनेमध्ये असा प्रकार घडणे ही बाब खरोखरच चिंताजनक आहे. परंतु याची नेमकी पार्श्वभूमी जरी अजून अंधारात असली किंवा वेगवेगळ्या स्वरूपात समोर येत असली तरी, घटनेपेक्षा त्यामागील वस्तुस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

नासिक मधील घटना हे एक निमित्त मात्र आहे, वास्तवात भारतामध्ये जिहाद ही संकल्पना अगदीच नवी नाही, महमूद गझनी पासून सुरु असणारी ही परंपरा आजपर्यंत येन केन प्रकारेन सुरु ठेवली जात आहे. खऱ्या इस्लामी राज्याची पूर्तता केवळ राजा मुस्लिम असून होत, नाही तर तिथे कायदेही इस्लामी असावे लागतात, अशी इस्लामची मान्यता आहे.

सम्राट अकबराने जेंव्हा त्याच्या राजवटीत हिंदूंना जिझिया माफ केला, हिंदूंना राज्यकराभारामध्ये मोठाली पदे दिली, गोहत्या बंद केली, दिन–ए–इलाही नावाचा धर्म स्थापन केला आणि सर्व धर्म सारखे असतात असे मानू लागला तेंव्हा त्याच्या पासून इस्लाम व इस्लामचे राज्य वाचवण्यासाठी सय्यद अहमद सरहिंदी (१५६२–१६२४) या इस्लामी धर्मपंडिताचा उदय झाला.

त्यांना 'दुसऱ्या सहस्त्रकाचा पुनुरुद्धारक' मानले जाते. प्रेषितांनंतर एक हजार वर्षांनी त्यांचा उदय झाला होता, या एक हजार वर्षात इस्लाममध्ये शिरलेल्या इस्लामबाह्य व अनुचित गोष्टी काढून टाकण्याचे महान कार्य त्यांच्या कडे आले होते. त्यांच्या विचारांचा विसाव्या शतकापर्यंतही मुस्लिम धर्मपंडितांवर प्रचंड प्रभाव पडलेला दिसतो. मौलाना आझादांनी त्यांना राष्ट्रीय पुरुष म्हणून गौरवीले आहे हे येथे नमूद करावेसे वाटते.

सय्यद अहमद नुसार, विशुद्ध इस्लाम आणि कुफ्र (इतर धर्म) हे परस्पर विरोधी असून, त्यांचे सहअस्तित्व अशक्य आहे.

सय्यद अहमद सरहिंदी यांनी सुरु केलेल्या जिहादची धुरा पुढे जाऊन जहांगीर, शहाजहान आणि अंततः औरंगझेब यांनी समर्थपणे वाहिली आणि भारतभर विशुद्ध इस्लामचा प्रचार, प्रसार आणि विस्तार केला.

शेख सय्यद अहमद यांचा वारसा पुढे शाह वलिउल्लाह या मौलवीने चालवताना, १७५८ च्या काळात शासक असणाऱ्या नबाब, सुलतान आदी मंडळी पर्यंत आपला विचार नेऊन ठेवला. त्यांनी सैनिकांना केलेले आवाहन हे जिहादचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी अत्यंत महत्वाचे आणि प्रत्ययदर्शी आहे.

हे सैनिकहो! अल्लाने तुम्हाला जिहाद करण्यासाठी जन्माला घातले आहे, मूर्तिपूजकांना अंकित करण्यासाठी व मूर्तिपूजेचा समूळ नाश करण्यासाठी तुम्हाला जिहाद करायावयाचा आहे, शरियतचे काटेकोर पालन करा.

एकंदरीतच जिहाद चे वास्तविक स्वरूप हे इस्लाम धर्माचा प्रचार, प्रसार आणि विस्तार करणे हेच असून त्यामध्ये अध्यात्मिकत आत्मोन्नत्ती किंवा मोक्षप्रती हा हेतू नाही असेच वाटते.

हि अशीच मदरसा छाप प्रेरणा घेऊन आपल्या देशातून पापिस्तान वेगळा झाला, सहचर्य नको आणि म्हणूनच स्वतंत्र भूमी हवी हाच फाळणी मागील उद्देश होता.

याच सय्यद अहमद, वली अल्लाहच्या, अली बंधू, मोहंमद अली जिना, यांच्या पिलावळी आजही भारत विरोधी जिहाद

करताना दिसतात. स्थलकाल परत्वे जर शस्त्राघाताने जिहाद पूर्णत्वास जाणार नसेल तर तो अन्य मार्गाने साधणे हे अर्थातच क्रमप्राप्त आहे. त्यामुळे वक्फ च्या नावाखाली हिंदूंच्या जमिनी बळकावणे, अचानक मजार उभा करून हिंदूंच्या किंवा सार्वजनिक जमिनीवर अधिकार सांगणे (लँड जिहाद), हलाल च्या नावाखाली अन्नपदार्थांमध्ये थुंकणे (थुक जिहाद), आणि महत्वाचे म्हणजे हिंदू मुलींना प्रेमजाळ्यात अडकवून त्यांच्याद्वारे मुस्लिम संतती जन्मास घालणे किंवा त्यांना दहशतवादी तळांवर पाठवून देणे (लव्ह जिहाद), हिंदूंचे व्यवसाय हस्तगत करण्यासाठी परदेशी वित्तपुरवठ्यातून कमी भावात वस्तू विकणे (व्यवसाय जिहाद) असे अनेक ज्ञात अज्ञात जिहाद निर्माण झालेले आपणांस दिसत आहेत.

त्यात भरीस भर म्हणून आताचा कॉर्पोरेट जिहाद ! नामवंत आस्थापना मधून नोकरी मिळवायची, तेथील कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन करायचा, पदोन्नती मिळवायची, आपल्यासारखे आणखी गट तयार करायचे आणि अखेर हिंदू महिलांची फसवणूक करून किंवा दबाव तंत्र वापरून त्यांना जबरदस्तीने धर्मांतरण करण्यास भाग पाडायचे हा देखील इस्लामच्या विस्ताराचाच भाग आहे असेच वाटते.

इस्लाम समजून उमजून त्यातली खरी तत्वे पटली आणि म्हणून त्याचा स्वीकार केला अशी फार काही उदाहरणे दिसत नाहीत, इस्लामच्या काफिर संदर्भातल्या संकल्पनांचे सोयीस्कर अर्थ समाजात पसरवून त्यातून दिशाभूल करून, निष्पाप, निरागस हिंदू महिलांना आपल्या जाळ्यात ओढायचे आणि त्यांचा दुर्दैवी अंत करायचा किंवा विदेशी बाजारात बटक्या म्हणून विक्री करायची हा निर्घृण प्रकार माणुसकीला काळिमा फासणारा आहे. आणि म्हणूनच जिहाद हे विस्तारवादाचे अ–धर्मयुद्ध आहे असेच म्हणावे वाटते.

एक जागृत हिंदू या भूमिकेतून या हा सारा प्रकार पाहता, खरे दुःख तर हे आहे कि, हिंदू समाजाला अजूनही वरील सर्व प्रकारचे जिहाद या केवळ हिंदुत्ववाद्यांनी किंवा राजकरण्यानी काढलेल्या टूम वाटतात. परंतु एक लक्षात घ्या केवळ हिंदुत्ववादीच नव्हे तर उच्च न्यायालय, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग भारत सरकार, बुद्धिस्ट असोसिएशन लडाख, अकाली दल अशा अनेकांनी या 'लव्ह जिहाद'च्या सामाजिक प्रश्नांकडे–संकटाकडे लक्ष वेधलेले आहे.

भारताचा एकंदरीत इतिहास आणि वर्तमान पाहता, अतिसहिष्णूपणा नामक अफूची गोळी घेऊन झिंगलेला हिंदू समाज आता तरी जागृत होईल का? आपल्या पुढील पिढ्यांसाठी तयार होणाऱ्या समस्या समजून घेणार आहे का? मुख्यत्वे करून हिंदू महिला, युवती या सजक बनणार आहेत का? योग्याच्या रूपात फिरणारे हे रावण आता तरी आपण ओळखणार आहोत का? हाच खरा प्रश्न आहे.

**श्रीपाद रामदासी**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**



# विश्व हिंदू परिषद - विधी प्रकोष्ठ आयाम (प. महाराष्ट्र प्रांत) अभ्यासवर्ग

**समान नागरी कायदा समाजा साठी महत्वाचा बरोबरीने हक्क सर्वांना, राष्ट्रीय एकात्मता: 'एक देश, एक कायदा' या तत्त्वामुळे देशातील नागरिकांमध्ये एकजूट वाढेल – ॲड अभिषेक अत्रे.**

दि. २९ मार्च २०२६ रोजी जिल्हा नाशिक येथे विधी प्रकोष्ठ आयामचा अभ्यासवर्ग ॲड. अभिषेकजी अत्रे (सुप्रीम कोर्ट विधीज्ञ तथा केंद्रीय संयोजक, विधी प्रकोष्ठ) व ॲड. सतिश गोरडे (प्रांत सहमंत्री तथा पालक विधी प्रकोष्ठ) यांच्या उपस्थितीत पार पडला.

प्रथम सत्रात ॲड. शैलेश भावसार (प्रांत संयोजक, विधी प्रकोष्ठ) यांनी विधी प्रकोष्ठ आयामाची रचना व उद्दिष्टे स्पष्ट केली, तर ॲड. संकेत राव यांनी कार्यपद्धती व मागील वर्षभरातील विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. हिंदू परिवार बळकट करण्यासाठी पारिवारिक कलह निवारण आवश्यक असल्याचे सांगत गौरीशंकर समुपदेशन केंद्र, पुणे येथे सुमारे १५० प्रकरणे समुपदेशनाद्वारे सोडवण्यात आल्याचे नमूद केले. तसेच हिंदू लीगल क्लिनिक व लीगल एड ऑन व्हील्स अंतर्गत २३ वस्त्यांचे सर्वेक्षण, ७५ लॉ कॉलेजमध्ये सत्रे घेऊन नवीन कार्यकर्त्यांची जोडणी, तसेच देवतांवरील अवमानकारक विनोदांवर कारवाई, ड्रग्स पुरवठ्यावर नियंत्रण व will deed विषयी जनजागृती अशा विविध कामांचा आढावा सादर केला. या सत्राचे सूत्रसंचालन ॲड. अश्विनी साळुंखे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. अथर्व गायकवाड यांनी केले.

द्वितीय सत्रात ॲड. सतिश गोरडे यांनी १७ मार्च २०२६ रोजी मंजूर झालेल्या महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कायद्याचा मुख्य उद्देश सक्तीने, फसवणूक करून किंवा आमिष दाखवून (उदा. पैसे, नोकरी, विवाह) होणारे धर्मांतर रोखणे हा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.तसेच स्वेच्छेने धर्मांतर करावयाचे असल्यास संबंधित व्यक्तीने ३० ते ६० दिवस आधी जिल्हाधिकारी किंवा सक्षम अधिकाऱ्यांना पूर्वसूचना देणे बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे त्या कायद्यांतर्गत शिक्षेच्या तरतुदींबाबत त्यांनी सांगितले की बेकायदेशीर धर्मांतर केल्यास ३ ते ७ वर्षांपर्यंत कारावास व दंडाची तरतूद आहे. महिला, अल्पवयीन किंवा अनुसूचित जाती–जमातीतील व्यक्तींच्या बाबतीत ४ ते ७ वर्षांपर्यंत कारावास व अधिक दंड होऊ शकतो. सामूहिक धर्मांतर प्रकरणांमध्ये ७ ते १० वर्षांपर्यंत कारावास व मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

भगवद्गीतेइतकेच भारतीय संविधान महत्त्वाचे असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यात आत्मा ओतला आहे, असे सांगत त्यांनी संविधानातील कलम २५ अंतर्गत धर्मस्वातंत्र्याचे अधिकार प्रभावीपणे स्पष्ट केले. तसेच फसवणुकीने धर्मांतर झालेल्या प्रकरणांमध्ये पीडितांना न्याय मिळवून देणे व त्यांचे पुनःस्थापन करण्याचे कार्य कसे केले जाते, याचाही आढावा दिला.

ॲड. खेताराम सोलंकी यांनी लव जिहाद, तसेच ख्रिश्चन धर्मात होणारे धर्मांतर, त्याच्या पद्धती, बेकायदेशीर होम चर्च व त्याविरोधातील उपाय याविषयी मार्गदर्शन केले. बेकायदेशीर भोंगे व त्यावरील कारवाई, तसेच RTI अर्ज प्रक्रिया याबाबतही त्यांनी माहिती दिली.

मुंबई उच्च न्यायालयातील ॲड. ब्रिजेश शुक्ला यांनी हायकोर्टात याचिका दाखल करण्याची प्रक्रिया, तसेच संबंधित केस लॉ विषयी मार्गदर्शन केले.

या सत्राचे सूत्रसंचालन ॲड. अनघा वाणी यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. अथर्व पवार यांनी केले.

तृतीय सत्रात ॲड. अभिषेकजी अत्रे यांनी युनिफॉर्म सिव्हिल कोड या विषयावर व्याख्या, रचना, उद्दिष्टे व त्याचे सामाजिक परिणाम यावर सखोल मार्गदर्शन केले. विवाह, पोटगी, वारसा, मृत्युपत्र यांसारख्या बाबींमध्ये कायदेशीर एकरूपता कशी येते व त्यातून सामाजिक न्याय व ऐक्य कसे वाढते हे त्यांनी स्पष्ट केले.

या सत्राचे सूत्रसंचालन ॲड. आदिती देवकर व ॲड. सोहम यादव यांनी संयुक्तपणे केले.

यावेळी संपूर्ण प्रांतातून ३० नवीन अधिवक्त्यांची नियुक्ती मा. ॲड. अभिषेकजी अत्रे यांच्या हस्ते करण्यात आली.

अशाप्रकारे अभ्यासवर्गात विविध सामाजिक व कायदेशीर विषयांवर सखोल चर्चा होऊन कायद्यांमधील नवीन बदलांची माहिती देण्यात आली. न्यायासाठी लढताना सर्व हिंदूंना एकत्र बांधून ठेवण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया समजून घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले.

**संकलन – ॲड. स्वाती जेरे, नाशिक**





## ‘कॉर्पोरेट जिहाद’ विरुद्ध देशभरात तीव्र निषेध आंदोलने

पुणे, १७ एप्रिल २०२६ : नुकताच नाशिक मधील कॉर्पोरेट जिहाद उघडकीस आला; जिथे हिंदू मुलींवर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकला जात होता आणि अनेक प्रकारचे अत्याचार केले जात होते. यानंतर अशी प्रकरणे इतरही कंपन्यांमध्ये कमीजास्त प्रमाणात होत असल्याचे लक्षात आले. या साऱ्याचा निषेध करण्यासाठी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलातर्फे देशभरात निषेध आंदोलने चालू आहेत. पुण्यामध्ये संध्याकाळी ७ वाजता अलका टॉकीज चौकात शेकडो हिंदू धर्माभिमानी लोकांनी या आंदोलनामध्ये सहभाग नोंदवला. याप्रसंगी अनेक नागरिकांनी आणि हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे आपली मते मांडली. विश्व हिंदू परिषद प्रांत मंत्री मा. किशोरजी चव्हाण आणि बजरंग दल प्रांत संयोजक मा. नितीनजी महाजन हेही यावेळी उपस्थित होते. त्यांनी विविध उदाहरणे देत जिहादी मानसिकतेचा तीव्र निषेध केला, तसेच या धर्मरक्षणाच्या कार्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहनही लोकांना केले.



## विश्व हिंदू परिषद, समरसता अंतर्गत

वैशाख शुद्ध अक्षय्य तृतीया... वीरशैव लिंगायत समाजाचे संस्थापक, समतासूर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज व परशुराम महाराज यांच्या जयंती निमित्ताने विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, पश्चिम महाराष्ट्र प्रांत यांच्या वतीने एकत्रित विनम्र अभिवादन करण्यात आले.

समता, सत्य आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारित समाजरचनेचा संदेश देणारे महात्मा बसवेश्वर हे एक महान समाजसुधारक आणि मानवतावादी होते. त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता याविरुद्ध ठामपणे आवाज उठवत समाजात समतेचा दीप प्रज्वलित केला. त्यांची हीच शिकवण आजही समाजाला प्रेरणा देत आहे.

या प्रसंगी श्री. किशोरजी चव्हाण विश्व हिंदू परिषद, प्रांत मंत्री, श्री. निखिलजी कुलकर्णी समरसता प्रांत प्रमुख तसेच सर्व आयामाचे परिषद चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**वृत्तांकन : श्री. राहुलजी विभुते समरसता प्रमुख, छत्रपती संभाजी भाग.**



# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त बार्शी प्रखंडात विनामूल्य बिसलरी पाणी बॉटल वाटप

बार्शी : विश्व हिंदू परिषद, बजरंग दल बार्शी प्रखंडाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पाच हजार विनामूल्य बिसलेरी पाणी बॉटलचे वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम पार पडला.

मंगळवारी १४ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल बार्शी प्रखंडा च्या वतीने बार्शी येथील महाद्वार चौकात बिसलेरी पाण्याच्या बाटल्यांचे वाटप आले. या उपक्रमाचा शुभारंभ बार्शी शहर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते तर विश्व हिंदू परिषद सोलापूर जिल्हा सहमंत्री बापूसाहेब कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी बार्शीचे प्रखंड सहमंत्री ॲड. गोविंद शिंदे, दिपक ढगे, ऋषीकेश भुजबळ, श्रीराम ठाकरे या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह बहुसंख्येने विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांचे स्वागत ॲड. गोविंद शिंदे यांनी केले. आभार दिपक ढगे यांनी मानले. विश्व हिंदू परिषद,बजरंग दलाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून दरवर्षी असा उपक्रम राबविला जातो. यंदा उन्हाळ्याचा तडाखा सर्वाधिक होता. त्यामुळे पाण्याची आवश्यकता जाणवली. रखरखत्या उन्हात न्हावून निघालेल्या अनुयायांना जागेवर विनामूल्य बिसलेरी पाण्याच्या बाटल्या मिळाल्याने प्रत्येक अनुयायांची तहान भागल्याने त्यांच्या चेहर्यावर आनंदाचा भाव दिसून येत होता. या स्तुत्य उपक्रमाची चर्चा संपूर्ण बार्शी शहरातील प्रत्येक चौकाचौकात ऐकायला मिळत होती.



# विहिंपच्या वतीने पंढरपुरात तीन महापुरुषांना अभिवादन...

**म.जोतिबा फुले, डॉ.आंबेडकर, म. बसवेश्वर जयंती साजरी**

पंढरपूर : सामाजिक परिवर्तन घडवणारे तीन महापुरुष म. जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म.बसवेश्वर. यंदा जयंती एप्रिल महिन्यात ११,१४ आणि १९ एप्रिल रोजी होती. पंढरपूर जिल्हा विश्व हिंदू परिषद बैठकीचा प्रारंभ या महापुरुषांना अभिवादनाने करण्यात आला. यावेळी प्रांत अध्यक्ष गजानन धरणे, समरसता आयाम प्रांत सदस्य रवींद्र साळे, विभागमंत्री विजयकुमार पिसे, जिल्हा अध्यक्ष डॉ.पारस राका यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मातृशक्ती विभाग संयोजिका भाग्यश्रीताई लिहिणे, दुर्गा वाहिनी विभाग संयोजिका प्रगतीताई नाकुरे (नातेपुते), जिल्हा सहमंत्री गोपाळदादा सुरवसे, बजरंग दल जिल्हा संयोजक श्रीनाथजी संगीतराव, गोरक्षा जिल्हा प्रमुख आकाशजी धोत्रे (करकंब), गोसंवर्धन आयामचे यशवंत सुर्वे (मोडनिंब), अनुलोमचे कार्यदर्शी रामेश्वर कोरे तसेच प्रखंडातील बजरंग दल, गोरक्षा आयामाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, मातृशक्ती, दुर्गावाहिनी आयामाचे प्रमुख कार्यकर्ते १४ एप्रिल रोजी बैठकीस उपस्थित होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. बसवेश्वर आणि महात्मा जोतिबा फुले या महापुरुषांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. याबैठकीत प्रांत अध्यक्ष गजानन धरणे, समरसता आयाम प्रांत सदस्य रवींद्र साळे, विभागमंत्री विजयकुमार पिसे, जिल्हा अध्यक्ष डॉ. पारस राका यांनी विहिंप कार्यवाढीसाठी मार्गदर्शन केले.

मातृशक्ती विभाग संयोजिका भाग्यश्रीताई लिहिणे, दुर्गा वाहिनी विभाग संयोजिका प्रगतीताई नाकुरे (नातेपुते), जिल्हा सहमंत्री गोपाळदादा सुरवसे, बजरंग दल जिल्हा संयोजक श्रीनाथजी संगीतराव, गोरक्षा जिल्हा प्रमुख आकाशजी धोत्रे (करकंब), गोसंवर्धन आयामचे यशवंत सुर्वे (मोडनिंब), अनुलोमचे कार्यदर्शी रामेश्वर कोरे तसेच प्रखंडातील बजरंग दल, गोरक्षा आयामचे कार्यकर्ते उपस्थितीत होते.



## विहिंप सामाजिक समरसता आयामच्या वतीने क्रांतीसूर्य म. जोतिबा फुले यांना अभिवादन

सोलापूर : विश्व हिंदू परिषद, समरसता आयामच्या वतीने क्रांतीसूर्य म. ज्योतिबा फुले यांची १९९वी जयंती सोलापूर येथे साजरी करण्यात आली. महान समाजसुधारक, स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते आणि सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा ज्योतिबा फुले यांना विश्व हिंदू परिषदतर्फे आदरांजली अर्पण करण्यात आली. सुपर मार्केट, सोलापूर येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला विश्व हिंदू परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष प्राचार्य श्री गजानन धरणे, जिल्हा अध्यक्ष श्री. विष्णुजी मोंढे, उपाध्यक्ष श्री. केदारजी पाटील, विभाग मंत्री श्री. विजयकुमार पिसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

स्त्री शिक्षण आणि सामाजिक विषमते विरुद्धच्या त्यांच्या लढाऊ कार्याचे स्मरण यावेळी करण्यात आले.या प्रसंगी विभाग सहमंत्री श्री संजयकुमार जमादार, प्रांत धर्माचार्य सहसंपर्क प्रमुख श्री. नागनाथ बोंगरगे, श्री. अमित सारोळकर, श्री. चन्नबसवेश्वर सोलापुरे, समरसता आयाम प्रमुख चंद्रकांत कुलकर्णी, राजाभाऊ माने, प्रवीण कांबळे उपस्थित होते.

---

## विश्व हिंदू परिषद, सोलापूर सामाजिक समरसता आयामतर्फे जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती साजरी



सोलापूर : रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी महान समाज सुधारक महात्मा बसवेश्वर यांची जयंती सोलापुरात विहिंपच्या वतीने साजरी करण्यात आली. विश्व हिंदू परिषदेच्या सामाजिक समरसता आयाम तर्फे या दिवशी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सकाळी ९ वाजता सोलापुरातील कोंतम चौक येथील महात्मा बसवेश्वर यांच्या अश्वारूढ प्रतिमेला विश्व हिंदू परिषद तर्फे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी पश्चिम प्रांत अध्यक्ष श्री गजानन धरणे, विभाग मंत्री श्री विजयकुमार पिसे, विभाग सह मंत्री श्री संजयकुमार जमादार, जिल्हा अध्यक्ष श्री विष्णुजी मोंढे, उपाध्यक्ष श्री. केदारजी पाटील समरसता आयाम प्रमुख चंद्रकांत कुलकर्णी उपस्थित होते. श्री गजानन धरणे यांनी उपस्थितांना महात्मा बसवेश्वर महाराजांचे विचार समजून सांगितले. समाजिक समरसता कशी कृतीमध्ये याविषयी उदाहरणे सांगितली.अभिवादन कार्यक्रमात विहिंप जिल्हा मंत्री श्री जयदेव सुरवसे, बजरंग दल संयोजक श्री अभय कुलथे, श्री प्रवीण जिल्ला, श्री चन्नबसवेश्वर सोलापुरे, श्री रमेश बेंबळकर, श्री राजशेखर पाटील, श्री सिद्धेश्वर गोकावी, श्री अनिल कोळी, श्री अमित सारोळकर, श्री कृष्णा देशपांडे, श्री मल्लिनाथ शबादे, श्री.महादेव न्हावकर उपस्थित होते.

**सोलापूर व पंढरपूर जिल्हा वृत्त संकलन : विजयकुमार पिसे, विभाग मंत्री**



# कथारूप रामायणवर आधारित परीक्षा, ९०१ विद्यार्थ्यांचा सन्मान

## नैतिक शिक्षा मूल्य आयामचा पश्चिम महाराष्ट्र प्रांतात यशस्वी उपक्रम

सोलापूर : विश्व हिंदू परिषद नैतिक शिक्षा प्रतिष्ठान अंतर्गत कथारूप रामायणवर आधारित परीक्षा पार पडली. यंदा १८शाळांमधून ९०१विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. उत्तीर्ण प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांच्या विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे सुवर्ण पदक, रौप्य पदक आणि कांस्यपदकाने सन्मानित केले. सिद्रामप्पा हत्तुरे प्रशालेतील यशस्वी विद्यार्थ्यांना विहिंप विभागमंत्री विजयकुमार पिसे (संपादक), मुख्याध्यापक सचिन जाधव यांच्या हस्ते सन्मान केला. याप्रसंगी सुधाकर कामशेट्टी, चन्नबसव सोलापुरे, रमेश बेंबळकर, मनिषा पाटील, संगीता हुमनाबादकर आदी मान्यवर उपस्थित होते.

२०२५– २६ शैक्षणिक वर्षांमध्ये कथारूप रामायणवर अभ्यास साठी विहिंप नैतिक आयामने एकूण ४१ शाळांशी संपर्क केला. १८ शाळांमधून ९०१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. या परीक्षेत प्रथम क्रमांकाचे ७१, द्वितीय क्रमांकाचे ५५, तृतीय क्रमांकाचे ४५ विद्यार्थी यशस्वी ठरले. परीक्षेत उत्तीर्ण सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम सर्व शाळांमध्ये मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सोलापूर जिल्ह्यात (पश्चिम महाराष्ट्र विभागात) नैतिक शिक्षण योजनेच्या संस्कृती व संवर्धन संदर्भात काम झालेले आहे.

मॉडर्न हायस्कूल व मॉडर्न हायस्कूल प्राथमिक शाळा, ह.दे.प्रशाला, सोनामाता आदर्श विद्यालय, सुशील मराठी प्राथ.शाळा, सोनामाता मराठी विद्यालय, नूतन प्रशाला, सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा, राजर्षी शाहू विद्यालय, बी. एस. कुलकर्णी प्रशाला, ज्ञानप्रबोधन विद्यालय, दलित मित्र भीमराव जाधव प्रशाला, ज्ञानसंपदा प्रशाला, दिगंबर जैन गुरूकुल प्रशाला, श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला, ज्ञानप्रबोधिनी मंदिर, वि.मो.मेहता प्राथ. शाळा, नूतन मराठी विद्यालय या १८ शाळांमधून ९०१ विद्यार्थी कथारूप रामायण परीक्षेस बसले होते. या अभ्यासानिमित्त शिक्षक, पालक यांचाही अभ्यास झाला. त्यामुळे त्यांनीही मुलांना परीक्षेस बसण्यास उद्युक्त केले. सेवा, संस्काराचे बीज विद्यार्थ्यांमध्ये चांगले रुजवण्यास नैतिक मूल्य शिक्षा अभियानचा उपक्रम स्तुत्य असल्याच्या भावना शाळांचे संस्थापक, संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालक यांनी यावेळी व्यक्त केला.

नैतिक मूल्य शिक्षा विभाग आयाम प्रमुख चन्नबसव सोलापुरे यांच्या टीमने कोकण प्रांताच्या धर्तीवर पश्चिम महाराष्ट्र प्रांतात असा उपक्रम यशस्वी करून दाखवला. या टीममध्ये ज्योती भालके, मनिषा पाटील, मुख्याध्यापक सचिन जाधव, सुधाकर कामशेट्टी, योगीनाथ शिरसी, महादेवी पाटील, संगीता हुमनाबादकर (बालक मंदिर मुख्याध्यापिका) या शिक्षक़ वृंदासह श्री रमेश बेंबळकर, श्री. भालचंद्र लुटे, श्री. चंद्रकांत कुलकर्णी, श्री. चनविरप्पा अतनुरे, श्री विनोदसिंह परदेशी, श्री. सुरेश कटकधोंड, श्री. दत्ता देवळे व श्री. मल्लिनाथ एकुंडे यांनी सहभाग नोंदवला. सदर विद्यार्थ्यांची उत्तर पत्रिका सौ. वंदन प्रभू व सौ महानंदा सोलापुरे यांनी तपासून गुण दिले. या उपक्रमात यांचेही योगदान लाभले, असे आयामप्रमुख चन्नबसव सोलापुरे यांनी सांगितले.




# लव जिहाद विरोधात विहिंपचा एल्गार : सोलापुरात विहिंप बजरंग दलाचे वतीने निदर्शने

सोलापूर : देशात वाढणाऱ्या विकृत जिहादी मानसिकता, अवैध अतिक्रमणे आणि सुनियोजित षडयंत्रांविरुद्ध कठोर कारवाईच्या मागणीसाठी सोलापुरात विहिंपने एल्गार पुकारला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून विहिंप बजरंग दलाचे वतीने निवेदन देण्यात आले. नाशिक आणि अमरावती भागात लव जिहादच्या वाढत्या घटनांबद्दल जिहादी घटकावंर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निदर्शनेप्रसंगी करण्यात आली. विहिंप आंतरराष्ट्रीय महामंत्री श्री. बजरंगलाल जी बागडा यांनी यासंदर्भात देशव्यापी निदर्शने आंदोलनाची हाक दिली होती. त्यासंदर्भात प्रांत मंत्री किशोरजी चव्हाण आणि प्रांत संयोजक नीतीम महाजन यांनी आवाहन केले होते. १७ एप्रिल रोजी सोलापुरात निदर्शने आणि आांदोलन करण्यात आले.

विभाग मंत्री विजयकुमार पिसे, विभाग सहमंत्री संजयकुमार जमादार, जिल्हामंत्री जयदेव सुरवसे आणि बजरंग दल संयोजक अभयकुमार कुलथे यांच्या नेतृत्वाखाली विहिंप कार्यकर्ते व बजरंगी यांनी आंदोलन केले. देशात वाढणाऱ्या विकृत जिहादी मानसिकता, अवैध अतिक्रमणे आणि सुनियोजित षडयंत्रांविरुद्ध कठोर कारवाईची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिक़ारी श्री. कार्तिकेयन यांना देण्यात आले. नाशिक येथे टीसीआय या कार्पोरेट कंपनीत धर्मातरण आणि लैंगिक छळ तसेच अमरावती परतवाडा येथे अल्पवयीन विद्यार्थिनींवर जिहादी अत्याचार व त्याचे व्हीडीओ व्हायरल करण्याची विकृत मानसिकता यांचा बंदोबस्त करताना कठोर कारवाई विनाविलंब करण्यात यावी, यासह देशभरातील विविध घटनांचा उल्लेख निवेदनात करण्यात आला.

जिल्हाधिक़ारी यांना निवेदन देताना जिल्हा अध्यक्ष विष्णूजी मोंढे, विभाग मंत्री विजयकुमार पिसे, विभाग सहमंत्री संजयकुमार जमादार, जिल्हामंत्री जयदेव सुरवसे, संयोजक अभय कुलथे, चन्नबसवेश्वर सोलापुरे, चंद्रकांत कुलकर्णी, प्रवीण जिल्हा, अमित सारोळकर, सूरज मोरे, बालाजी रजपूत, मदन राठोड, कृष्णा देशपांडे, अनिल कोळी, रवी बोल्ली, रमेश बेम्बळकर, सिद्धेश्वर गोकावी, अक्षय कनकुंटला, आकाश सूर्यवंशी, अरुण नंदाल, राजशेखर पाटील, आदित्य चिप्पा, दिनेश त्रिमल, अभिजित गुलबर्गेवाले आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

# सामाजिक समरसता संदेश

हडपसर जिल्हा : रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी, हडपसर जिल्ह्यातील सातववाडी प्रखंड येथे सामाजिक समरसता समरसतेचा संदेश देत, छत्रपती श्री शिवाजी महाराज, छत्रपती श्री संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त येथे प्रतिमांचे पूजन करून सामाजिक समरसतेचा संदेश देण्यात आला.



या कार्यक्रमाकरिता प्रांत सहमंत्री, श्री. नितीन वाटकर, दुर्गा वाहिनी प्रांत, बालसंस्कार प्रमुख, सौ. सुरेखाताई कवडे, पुणे पूर्व विभाग मंत्री, श्री.संतोष अनगोळकर यावेळी उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रांत सहमंत्री माननीय नितीनजी वाटकर यांनी मार्गदर्शन करत असताना सांगितले की, आम्ही सर्व हिंदू आहोत, बंधुभावाच आमच नात आहे. आमच्यात कोणी ही पतित, लाचार नाही, आम्ही सर्व स्वाभिमानी आहोत, आम्ही समान आहोत. 'हिंदू रक्षा' हाच आमचा संकल्प आहे. त्यासाठीच हे समरसतेचे कार्य आपण सर्व मिळून करत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सदर कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन जिल्हा धर्मप्रसार प्रमुख, श्री. अक्षय अबनावे, जिल्हा कोषाध्यक्ष, श्री.राहुल मोडक, सातववाडी प्रखंड मंत्री, श्री. मंगेश उंद्रे व त्यांचे सर्व प्रखंडातील सहकारी यांनी केले होते. त्याचबरोबर श्री. अक्षय आबनावे यांचे माध्यमातून पुढील एक महिना या ठिकाणी मर्दानी खेळ व स्व– संरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून व कार्यक्रमाचे उद्घाटक वरील सर्व मान्यवर उपस्थित होते. यावेळी विश्व हिंदू परिषद सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते या ठिकाणी उपस्थित होते. त्याचबरोबर हडपसर परिसरातील लोकप्रतिनिधी व नागरीक मोठ्या प्रमाणात या ठिकाणी कार्यक्रमाकरिता उपस्थित होते. समारोप करतेवेळी पुणे पूर्व विभाग मंत्री, माननीय श्री.संतोषजी अनगोळकर यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाचा समारोप केला.

**श्री.राजेंद्र शेवाळे, (मंत्री, हडपसर जिल्हा)**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# ॥ श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ॥

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि;
# श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे – ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० MW क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० TCD ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० KLPD क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा CNG प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO_2$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ KLPD क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती (2G R & D) प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

श्री. महेश संभाजीराव करपे
श्री. हेमंत संभाजीराव करंजे
श्री. योगेश दत्तात्रय ससाणे
श्री. अनिल जयवंतराव भुजबळ
श्री. किसन दिनकर शिंदे
श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम
श्री. अनिल लक्ष्मण बधे
श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे
श्री. माधव पांडुरंग राऊत
सौ. लता सतिष केंढे
श्री. हनुमंत बबन शिवले
श्री. भगवान दशरथ मेमाणे

श्री. दत्ताराम मारुती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## – मुख्य कार्यालय –

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# चांगल्या बातम्या

१) भारताच्या अन्य भागातून पूर्वांचलाला जाण्यासाठी चिकन नेक (सिलिगुडी) कॉरिडॉर मार्गे जावे लागते. हा कॉरिडॉर जेमतेम २२ किलोमीटर रुंद व ४० किलोमीटर लांबीचा आहे. हा पट्टा नेपाळ व बांगलादेश या देशांच्या मध्ये आहे. तसेच भूतानच्या सरहद्दीजवळ आहे. आणि चीनची सरहद्द ही फक्त १०० किलोमीटर अंतरावर आहे. संरक्षणाच्या दृष्टीने हा पट्टा खूप महत्त्वाचा आहे.

केंद्रीय मंत्री श्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की पश्चिम बंगाल मधील चिकन नेक (सिलिगुडी) कॉरिडॉर मध्ये २० ते २४ मीटर खोलीवरील बोगद्यात दुहेरी रेल्वे मार्ग बनवला जाणार आहे. इतक्या खोलीवरील रेल्वे मार्ग जास्त सुरक्षित असतो. तसेच भारताने रेल्वे मार्गावरून नेता येणारी क्षेपणास्त्र डागण्याची यंत्रणा संशोधित केली आहे. त्यासाठी या बोगद्यातील रेल्वे मार्गाचा उपयोग होऊ शकतो.

तसेच सध्याच्या जमिनीवरील रेल्वे मार्गा चा विस्तार करून चार रेल्वे मार्ग केले जाणार आहेत. म्हणजे पूर्वांचलाला जायला ६ रेल्वे मार्ग असतील. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने या बजेटमध्ये १,२०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

२) केंद्रीय मंत्री श्री वैष्णव यांनी सांगितले की देशाच्या इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीने २०२५ मध्ये ४ लाख कोटी रुपयांचा टप्पा प्रथमच पार केला. यामध्ये स्मार्टफोन ची निर्यात २ लाख ३ हजार कोटी आहे. २०२४ मधील १ लाख १० हजार कोटींच्या स्मार्टफोन निर्याती च्या तुलनेत ही वाढ खूपच जास्त आहे.

या आर्थिक वर्षात मोबाईल चे उत्पादन ६ लाख ७५ हजार कोटी रुपये होण्याचा अंदाज आहे. या क्षेत्रात २५ लाखापेक्षा जास्त रोजगार निर्मिती झाली आहे.

३) २०२५ मध्ये दक्षिण आफ्रिकेत विकल्या गेलेल्या एकूण कार पैकी ५०% कार या भारतात बनलेल्या आहेत. टाटा मोटर्स, महिंद्रा या भारतीय कंपन्यांच्या कार किंवा जपानी, द. कोरियन कंपन्यांच्या कार मारुती, टोयाटो वगैरे पण त्या ही भारतात बनलेल्या.

कर कपातीमुळे २०२४-२५ मध्ये भारतात आतापर्यंतची सगळ्यात जास्त, म्हणजे ४५ लाख कार विक्री झाली. तसेच सगळ्यात जास्त म्हणजे ७ लाख ७० हजार कारची निर्यात झाली.

मागील वर्षात देशात १ कोटी ९६ लाख दुचाकींची विक्री झाली तर ४३ लाख दुचाकींची निर्यात झाली. देशात व्यवसायिक वाहने ९ लाख ५७ हजार विकली गेली. तर ८१,००० वाहनांची निर्यात झाली.

इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीतही खूप वाढ झाली. १ लाख ७७ हजार कार तर १२ लाख ८० हजार दुचाकी विकल्या गेल्या.

४) शनिवारी १४ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान श्री मोदी जी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्टार्ट अप साठी १०,००० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली. हा निधी प्रामुख्याने नाविन्यपूर्ण उत्पादन क्षेत्रातील स्टार्ट अप साठी वापरला जाईल.

२०१६ मध्ये स्टार्ट अप इंडिया उपक्रमा अंतर्गत पहिल्यांदा १०,००० कोटी चा निधी मंजूर केला होता. त्याचा फायदा १३७० स्टार्ट अप नी घेतला व त्यामध्ये २५,५०० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. पहिल्या निधी च्या यशस्वी अंमलबजावणीनंतर हा दुसरा निधी मंजूर केला आहे.

२०१६ मध्ये स्टार्ट अप इंडिया ची स्थापना झाली. तेव्हा स्टार्टअप ची संख्या जेमतेम ५०० होती. ही संख्या आज २ लाखाच्या पुढे गेली आहे. एकट्या २०२५ मध्येच विक्रमी ४९ हजार ४०० स्टार्टअप ची नोंदणी झाली. या एकूण २ लाख ७ हजार स्टार्ट अप मध्ये २१.९ लाख प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. सध्या भारतात १०० युनिकॉर्न (१०० कोटी डॉलर पेक्षा जास्त मूल्य असलेल्या कंपन्या) कंपन्या कार्यरत आहेत.

५) नवी दिल्ली येथील भारत मंडपम् येथे झालेल्या एआय् समिटचे उद्घाटन आपले पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी १६ फेब्रुवारी रोजी केले. या समिटचे घोषवाक्य सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय आहे. ४५ पेक्षा जास्त देशांची

मंत्रीस्तरीय शिष्टमंडळे व जगातील ३,२५० पेक्षा जास्त वक्ते यात सहभागी आहेत.

७,००० चौ. मीटर जागेवर प्रदर्शनी असून १३ देशांच्या विशेष दालनांचा यात समावेश आहे. तसेच ६०० पेक्षा जास्त प्रगत स्टार्ट अप ही यात सहभागी आहेत.

भारताने ३ जागतिक एआय् चॅलेंज स्पर्धा घोषित केल्या. या स्पर्धेसाठी ६० हून अधिक देशांमधून ४,६५० पेक्षा जास्त अर्ज आले.

या परिषदेत भारताच्या ८ वर्षाच्या रणवीर सचदेवा याने स्वतःच्या एआय मॉडेल बद्दल विचार मांडले. प्राचीन भारतीय तंत्रज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांची सांगड कशी घालता येईल हे त्याने सांगितले. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून रणवीर आपल्या बुद्धीची चमक दाखवत आहे. चौथ्या वर्षी त्याने नासा कडे प्रकल्प सादर केला. तर वयाच्या पाचव्या वर्षी त्याला पल कंपनीने प्रोग्रॅमर केले. वयाच्या सहाव्या वर्षी त्याला युनो मध्ये बोलण्यासाठी आमंत्रित केले. तर सातव्या वर्षी त्याने मागील वर्षी फ्रान्समध्ये झालेल्या एआय् समिट मध्ये प्रेझेंटेशन दिले.

भारताने २२ भारतीय भाषांमधील भारतजेन एआय् प सादर केले. हे सध्याच्या चॅट जीपीटीला टक्कर देऊ शकेल.

भारतातील १०,००० हून अधिक आलेल्या स्टार्टअप मधून महाराष्ट्राच्या सृष्टी श्रीवास्तव यांच्या स्टार्टअप ला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

केंद्रीय मंत्री श्री अश्विनी वैष्णव म्हणाले की येत्या २ वर्षात भारतात एआय मध्ये २ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होण्याची शक्यता आहे. टाटांनी ओपन एआय बरोबर भागीदारी घोषित केली. पहिल्या टप्प्यात १०० मेगावॉट एआय् क्षमता विकसित केली जाईल. ही क्षमता १ गिगॅवॉट पर्यंत वाढवण्यात येणार आहे.

गुगलने १५ लाख कोटी रुपयाची गुंतवणूक भारतात एआय् मध्ये करत असल्याचे जाहीर केले. तर रिलायन्स इंडस्ट्रीज ने पुढील ७ वर्षात १० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करत असल्याचे जाहीर केले. रिलायन्स चा भर हा जसा त्यांनी डाटा स्वस्त दिला. तसा ए आय स्वस्त देण्यावर असेल.

६) भारताने २७ जानेवारी २०२६ रोजी युरोपियन युनियन बरोबर मुक्त व्यापार करार केला. यामुळे जवळपास ९९% भारतीय निर्यातीवर शुल्क नसेल. तसेच आयात होणाऱ्या शेतमाल व दुग्धजन्य पदार्थावरील शुल्क भारताने तसेच ठेवले. मागील वर्षी भारताने ६ लाख ४० हजार कोटी रुपयांची वस्तू निर्यात केली तसेच ७ लाख कोटी रुपयांची उलाढाल सर्व्हिसेस मध्ये झाली. जगातील चौथ्या व दुसऱ्या अर्थव्यवस्थेमधील या करारास त्यामुळे मदर ऑफ ऑल डिल्स असे संबोधण्यात आले. भारतातून निर्यात होणाऱ्या टेक्सटाईल, चामडे, पादत्राणे वगैरे गोष्टीला चांगला उठाव मिळेल. फक्त टेक्सटाइल ची निर्यात सध्याच्या ६३,००० कोटी रुपयां वरून ३,४०,००० कोटी होण्याचा अंदाज आहे. त्यानंतर पाठोपाठ ७ फेब्रुवारी रोजी भारताने अमेरिकेबरोबर मुक्त व्यापार कराराचा ढोबळ मसुदा निश्चित केला. याला फादर ऑफ ऑल डिल्स असे अमेरिकेने संबोधले. कारण हा जगातील चौथ्या व पहिल्या अर्थ व्यवस्थेतील करार होता. अमेरिकेबरोबरचा करार खूप गाजला. करण अमेरिकेने भारतावर ५०% आयातशुल्क लावले होते. अमेरिकेच्या आग्रहामुळे रशियाकडील तेल खरेदी भरताने बंद / कमी केली. पण याशिवाय अमेरिकेच्या कोणत्याही जाचक अटी न स्वीकारता हा करार झाला. विशेषतः अन्नधान्य, दूध, इलेक्ट्रिक कार वगैरे वरील भारताचे आयात शुल्क पूर्वीसारखेच राहणार आहे.

स्टेट बँकेच्या अहवालानुसार लगेचच अमेरिकेला होणारी निर्यात ही तेथून होणाऱ्या आयाती पेक्षा ९ लाख कोटी रुपयांनी जास्त होईल. तसेच ७५% पेक्षा जास्त शेती उत्पादनांना अमेरिकेत आयात शुल्क असणार नाही. अमेरिकेच्या अंतर्गत घडामोडींमुळे या करारावरील स्वाक्षऱ्या राहिल्या आहेत. भारताने आतापर्यंत १५ समुहा बरोबर (यामध्ये ३७ देश आहेत) मुक्त व्यापार करार केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने युएई, न्युझीलँड, जपान, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, दक्षिण कोरिया, इंग्लंड, स्विझर्लंड, युरोपियन युनियन, वगैरे देश आहेत. तर अनेक देशांबरोबर बोलणी चालू आहेत. या सर्व झालेल्या व होणाऱ्या करारामुळे भारताची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढेल. तसेच भारतात परदेशी गुंतवणूक येईल. नवीन तंत्रज्ञान येईल. आणि येथील रोजगार संधी खूप वाढतील. याचा फायदा विकसित भारत चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी होईल.

७) आसाम मधील २,३०० कोटी रुपयांच्या टाटांच्या

सेमिकडंक्टर फॅक्टरीत, १८९ टन वजनाची सामुग्री घेऊन बंगाल मधील डायमंड हार्बर येथून निघालेली पहिली बोट ब्रम्हपुत्रा नॅशनल वॉटर वे – २ मार्गे पांडू बंदरात पोहचली या वॉटर वे मुळे ट्रान्सपोर्टेशन खर्च कमी होईल. तसेच प्रदूषणही कमी होईल.

या कारखान्यात दररोज ४ कोटी ८० लाख चिप्स देश, विदेशासाठी बनवल्या जाणार आहेत.

८) दोन वर्षांपूर्वी २२ जानेवारी २०२४ ला अयोध्येत श्री रामलल्लांची प्राणप्रतिष्ठा झाली. अगदी पहिल्या दिवसापासून भारतातील व परदेशातील असंख्य लोक दर्शनासाठी येत आहेत. आणि आता अयोध्येने जगात उच्चांक गाठला आहे.

ख्रिश्चन जगाचे केंद्र असलेल्या व्हॅटिकनला वर्षाला सुमारे ९० लाख भाविक भेट देतात.

मक्का (सौदी अरेबिया): हज आणि उमरासाठी वर्षाला सुमारे २ कोटी भाविक जातात.

तर २०२४ मध्ये अयोध्येत राममंदिरला १६ कोटींहून अधिक भाविकांनी भेट दिली. तर २०२५ मध्ये ५० कोटी पेक्षा जास्त भाविकांनी भेट दिली.

राममंदिर बांधण्यासाठी आतापर्यंत १,८६० कोटी रुपये खर्च आला. तर ३,००० कोटी रुपये दान व देणगी समाजाने दिली.

SBI Research च्या रिपोर्टनुसार, राम मंदिरामुळे उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेत, रोजगारात व सुविधा मध्ये मोठी वाढ होत आहे. उत्तर प्रदेश ची वार्षिक उलाढाल ४ लाख कोटी ने वाढली. केवळ एका वर्षात २५,००० कोटींचा अतिरिक्त महसूल जमा झाला आहे. १ लाख रोजगार निर्माण होत आहे. व केवळ अयोध्येत गुंतवणूक १०,००० कोटी पेक्षा जास्त केली जात आहे.

**कुमार आठवले**

◈ ◈ ◈

संवाद

**संवाद ट्रेडप्रिंट्स**

**छपाई क्षेत्रातील एक दर्जेदार सचोटीपूर्ण व्यवहार**

**बी–७, गोवईकर इमारत, शनिवार पेठ, पुणे – ३० दूरध्वनी : (०२०) २४४८५६३२**

**Email : sanwadpvt@gmail.com**

# प्रयत्न का प्रारब्ध

या अत्यंत गहन अशा विषयावर मित्र मंडळींमध्ये चर्चा चालू असताना सगळ्यांचे विचार लक्षात घेता मी अशा निष्कर्षाप्रत आलो की खरंच या दोन्ही गोष्टी आपापल्या ठिकाणी उत्तम, श्रेष्ठ व पूरक आहेत. यामध्ये डावे-उजवे ठरवणे जसे कठीण आहे तसेच त्यांच्या शिवाय जीवनामध्ये कोणी यशस्वी होत नाही हेही तेवढेच खरे. आमच्या वैद्यकीय व्यवसायामध्ये तरी याचा जागोजागी प्रत्यय सर्वानांच येत असतो.

अनेकदा असे होते की एखादा अत्यंत खराब मरणासन्न अवस्थेतील रुग्णावर सर्व उपचार व प्रयत्न करून सुद्धा त्याची तब्येत सुधारत नसताना अचानक तो बरा होऊ लागतो, चालत घरी जातो. तर एखादा घरी जाण्याच्या तयारीत असलेल्याला त्याच दिवशी हार्ट अटॅक येतो किंवा त्याचा आजार इतका बळावतो की तिथे आपले प्रयत्न फुकट जातात, अपुरे पडतात. एखाद्या अपघातात गंभीर जखमी झालेला व्हेंटिलेटर वरचा रुग्ण सर्व आशा सोडली असतानादेखील एकदम सुधारतो तेव्हा त्याच्या आयुष्याची दोरी बळकट म्हणून तो वाचला असे सर्व म्हणतात. म्हणजे काय तर प्रयत्न तर हवाच पण प्रारब्ध ही तेवढेच महत्वाचे ठरते.

डॉक्टरांच्या जीवनात तर असे प्रसंग वेळोवेळी येतात आणि या गोष्टी आम्हाला नेहमीच संभ्रमात पाडतात. असाच एक मला आलेला अनुभव लिहीत आहे. साधारण वीस वर्षांपूर्वी ची ही गोष्ट. क्युट अपेन्डिसायटीस चा अटॅक आल्यामुळे एक पंचवीस वर्षाचा तरूण माझ्याकडे आला असताना त्याच्या सर्व तपासण्या केल्यावर त्याला अपेंडिक्स फुटल्यामुळे ताबडतोब शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे असे लक्षात आले. त्याचा फिटनेस घेऊन शस्त्रक्रियेची तयारी करून त्याचे मी ऑपरेशन केले. खराब फुटलेले अपेंडिक्स व त्या बरोबर पोटात पसरलेला पू काढून टाकून सर्व जखम स्वच्छ करून बंद केली. तासाभरामध्ये सर्व शस्त्रक्रिया पार पडून पेशंटला वॉर्ड मध्ये शिफ्ट केले.

दोन दिवसात पेशंटच्या तब्येतीत खूप सुधारणा झाल्यामुळे तिसऱ्या दिवशी त्याला तपासल्या नंतर मी घरी पाठवणार होतो. सकाळी त्याला तपासताना तो दोन-तीनदा खोकला, श्वास घ्यायला थोडा दम लागतो आहे अशी तक्रार त्यांने केली. तक्रार किरकोळ होती पण तरीही त्याकडे दुर्लक्ष न करता मी त्याच्या तपासण्या करून मगच त्याला घरी पाठवण्याचे ठरवले. तेव्हा त्याचा छातीचा एक्स-रे काढल्यानंतर त्याच्या दोन्ही फुफ्फुसात सूज येऊन पाणी झाल्याचे (pulmonary oedema) लक्षात आले. यावरचे उपचार लगेच चालू केले. फिटनेस दिलेल्या फिजिशियन ने तपासल्यावर पेशंटला आयसीयूमध्ये शिफ्ट केले व जरूर पडल्यास व्हेंटिलेटर लागेल असे सांगितले.

असे का झाले हे आम्हाला कोणालाच कळत नव्हते कारण पेशंटचे ऑपरेशन व्यवस्थित निर्विघ्नपणे पार पडले होते. त्याचे सर्व पॅरामीटर्स एकदम नॉर्मल होते. नंतर दोन दिवस देखील तो अगदी व्यवस्थित होता, तेव्हा तिसऱ्या दिवशी अचानक असे का व्हावे हा संभ्रम सगळ्यांनाच पडला होता.

तेव्हा कारण शोधल्यानंतर असे कळले की त्याला जन्मताच हार्ट प्रॉब्लेम होता ज्याचा त्याला पूर्वी कधीच त्रास झाला नव्हता. याबद्दल त्याला किंवा नातेवाईकांनाही कसलीच कल्पना नव्हती ऑपरेशन पूर्वीचा ईसीजी नॉर्मल होता व आम्हालाही तसे त्यानी कधी त्याच्या त्रासाबद्दलही सांगितलेले नव्हते. पण ऑपरेशन नंतर दोन दिवसांनी तो वाढल्यामुळे तो पेशंट हार्ट फेल्युअर मध्ये जात होता. तेव्हा लगेचच हृदयरोग तज्ञाच्या मार्फत त्याला

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

दोन दिवस आयसीयूमध्ये सर्व ट्रीटमेंट केल्यावर पेशंट पुन्हा पूर्ण खडखडीत बरा झाला व कोणतेही वैगुण्य त्याच्यात न राहता घरी गेला. यामध्ये आम्ही केलेले शंभर टक्के प्रयत्न यशस्वी झालेच पण त्याला नशीबाचीही साथ मिळाली कारण ऑपरेशन टेबलवर त्याला काहीही न होणे, भुली मधून तो सुखरूप बाहेर येणे, तिसऱ्या दिवशी त्याचा प्रॉब्लेम दुर्लक्ष न करता लक्षात येणे, त्यासाठी उपाय योजना लगेच होणे व त्यातून तो बरा होणे ही सर्व त्याच्या नशिबाने व आमच्या देखील नशिबामुळे यशस्वीरित्या पार पडले असे म्हणण्यास हरकत नाही. त्यासाठी आम्ही सर्वांनी मनापासून देवाचे आभार मानले. तो येथील एका राजकारणी नेत्याचा नातेवाईक असल्याने सर्वांनाच टेन्शन होते व तो सहीसलामत बरा होणे आमच्या दृष्टीने खूप महत्वाचे होते.असो.

आय पी एल क्रिकेट चे सामने सध्या खूप जोरात चालू आहेत आणि अनेक मॅचेस मध्ये शेवटच्या बॉलवर एखादा संघ सामना जिंकतो व एखादा हरतो हे प्रकर्षाने जाणवते. सामना जिंकण्यासाठी प्रयत्न दोन्ही संघ करतच असतात परंतु एखाद्याचे नशीब फळफळते तर एखाद्यावर ते रुसते हे चांगलेच लक्षात येते.

परीक्षेला कसून अभ्यास केलेला विद्यार्थी अचानक पेपर फुटल्यामुळे वा परीक्षा रद्द झाल्याने किंवा पेपर लिहिताना काहीच न आल्यामुळे अनुत्तीर्ण होतो तर अगदी कमी मोजकाच अभ्यास काहीजण उत्तम मार्क्स मिळवून पास होतात. हीच गोष्ट उद्योग-धंद्यात हे प्रकर्षाने जाणवते.

अत्यंत कष्ट करून सचोटीने धंदा करूनही काही जणांना व्यवसायात यश येत नाही तर कमी हुशारी पण नेमके काय करायचे कसे करायचे हे ठरवल्याने काही जण व्यवसायात खूप यशस्वी होतात तेव्हा त्याचे प्रारब्धही त्यात खूप महत्त्वाचे ठरते हे नक्कीच.

नैसर्गिक आपत्ती येते पण यातून सहीसलामत सुखरूप बाहेर पडणे हे देखील आपल्या प्रारब्धावर व प्रयत्नावर अवलंबून असते. आम्ही केदारनाथच्या ट्रिप वरून परत आलो आणि आठ दिवसांमध्ये तिथे महापूर येऊन सर्व गोष्टी उद्ध्वस्त झाल्या हे देखील आमचे नशीबच होते की आम्ही तिथे असताना काही झाले नाही व आमची ट्रिप देखील आम्ही आठ दिवस आधी प्लॅन केली. विमान अपघात किंवा रेल्वे अपघातात सापडणं त्यातून सहीसलामत वाचणे अथवा जीव गमावणे हे मानवाच्या हातात नक्कीच नाही. याचे प्रत्यंतर अनेकांनी आपले कुटुंबीय कोरोनाच्या साथीत गमावलेले आपल्याला माहिती आहे तेंव्हात्यांच्या नशिबामध्ये तसेच घडणार होते याचे प्रत्यंतर येते व मानवाचे प्रयत्न मात्र एका मर्यादेतच राहतात हे मनोमनी पटते.

एकदा बिरबलाला देखील अकबराने विचारले की प्रारब्ध श्रेष्ठ का प्रयत्न श्रेष्ठ तेव्हा त्याने दोन्ही आपापल्या जागी श्रेष्ठ आहेत असे उत्तर दिले पण बादशहाचे समाधान न झाल्याने व त्याने पुन्हा पुन्हा विचारल्यावर बिरबलाने प्रारब्ध श्रेष्ठ आहे असे सांगीतले. परंतु अकबराला हे याचे उत्तर न पटल्याने त्याने त्याची परीक्षा घेण्याचे ठरवले.

एक दिवस बिरबल सकाळी राजवाड्यात एका अरुंद गल्लीतून येत असताना राजाने त्याला पाहिले तेव्हा त्याच्या अंगावर एक माजलेला हत्ती सोडण्यास माहुताला सांगितले. अचानक समोरून येणारा तो माजलेला हत्ती पाहून क्षणभर बिरबल घाबरला परंतु लगेच प्रसंगावधान राखून त्याने इकडे तिकडे पाहिले असता त्याला एक मेलेले कुत्रे रस्त्यावर तिथेच पडलेले दिसले. क्षणाचाही विलंब न करता त्याने ते उचलले हत्तीच्या डोक्यावर ते जोरात फेकले, अनपेक्षित झालेल्या हल्ल्यामुळे हत्ती घाबरला व परत फिरला आणि बिरबल शांतपणे चालत राजवाड्यात गेला हे सर्व बादशहाने आपल्या गच्चीतून पाहिले होते. तेव्हा बिरबलाला आल्यावर त्याने विचारले की बिरबला आज तू १००% प्रयत्न केलास म्हणूनच तू वाचलास तेव्हा प्रयत्न हेच प्रारब्धा पेक्षा श्रेष्ठ होय हे प्रारब्ध रुसल्यामुळे आज तुझ्यावर हा जीवघेणा प्रसंग


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

उद्धभवला, म्हणून तू आता माझे म्हणणे मान्य कर.

तेव्हा बिरबल म्हणाला महाराज क्षमा करा पण आज देखील माझ्या प्रारब्धा मुळेच मी वाचलो कारण, ते मेलेले कुत्रे मला तिथे सापडणे, ते उचलून त्या हत्तीच्या अंगावर मारावे ही बुद्धी मला होणे व लगेच ती कृती मी करणे आणि ते देखील नेम न चुकता बरोब्बर त्याच्या गंडस्थळावर जाऊन अपटणे व तो हत्ती माघारी फिरणे या सगळ्या माझ्या प्रयत्नांमध्ये मी जिवंत राहण्या साठी माझे नशीबच बलवत्तर होते,प्रारब्धाची खूप मोठी साथ होती, म्हणून मला प्रारब्ध हे प्रयत्ना पेक्षा नक्कीच काकणभर श्रेष्ठ आहे असे वाटते.

श्री अंबुराव महाराज (श्री परम पूज्य गुरुदेव रानडे यांचे गुरू बंधू) यांचे तर यावरील उत्तर अत्यंत समर्पक व विचार केल्यानंतर पूर्णपणे पटण्यासारखे आहे प्रयत्न मोठा की प्रारब्ध मोठे असे एकदा त्यांना विचारल्यावर श्री अंबुराव महाराज म्हणाले की प्रयत्नही खोटा प्रारब्ध ही खोटे आणि फक्त शेवटी देवच खरा. (कारण त्याच्या प्रेरणेने व त्याच्या अधिपत्याखाली या दोन्ही गोष्टी आहेत)

तेव्हा मित्रांनो शेवटी मानवाच्या हातात काहीच नसून सर्व अशा एका अनाकलनीय शक्तीच्या हातात आहे ज्याला कोणी नशीब म्हणतात, कोणी देव म्हणतात, कोणी सुपरनॅचरल पावर म्हणतात, कोणी पंचमहाभूते वा निसर्ग म्हणतात, तर कोणी आणि काही म्हणतात. परंतु मानवावर, त्याच्या जीवनावर व सर्व सृष्टीवर या शक्तीचे अधिपत्य आहे हे आपणास मान्य केल्याशिवाय पर्याय नाही. अर्थात प्रयत्न करणे मात्र आपल्या हातातच आहे केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे म्हणून प्रयत्न पूर्णपणे १००% करावेत पण प्रयत्नाअंती परमेश्वर असतोच व तो जे करेल ते आपल्या भल्यासाठीच असते हे मात्र कायम लक्षात ठेवावे.

**डॉक्टर संजीव दाते, कन्सल्टिंग जनरल सर्जन चिंचवड.**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# हुतात्मा दिन संकल्पना

मित्रांनो ३० जानेवारी हा दिवस आपल्या देशामध्ये हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. याचे प्रमुख कारण म्हणजे, भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये ज्यांनी देशाचे नेतृत्व केले आणि ज्यांना राष्ट्रपिता म्हणून संबोधले जाते, त्या महात्मा गांधींना १९४८ साली याच दिवशी हौतात्म्य प्राप्त झाले. त्यांची स्मृती निरंतर जपली जावी यासाठी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो आणि या निमित्ताने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करून हा दिवस साजरा होतो. या हुतात्मा संकल्पनेची माहिती घेण्यासाठी आपण त्याच्याशी निगडीत असे शब्द बघूयात.

१. हुताशन म्हणजे अग्नी.

२. होम म्हणजे यज्ञ

३. होमकुंड अथवा यज्ञकुंड म्हणजे ज्यात हुताशन म्हणजे अग्नी, शास्त्रीय पद्धतीने प्रज्वलित करून, होम केला जातो ते भांडे अथवा मोठे कुंड.

४. हवनीय म्हणजे यज्ञामध्ये जे घन अथवा द्रव पदार्थ, अग्नीमध्ये अर्पण केले जातात ते समिधा, धान्य, मध, तूप, फळे इ.

५. हवन म्हणजे होमकुंडात अग्नीला हवनीय अर्पण करणे. याला आहुती देणे असेही म्हणतात.

६. यज्ञ देवता म्हणजे जी देवता प्रसन्न होण्यासाठी यज्ञ केला जातो ती.

७. यज्ञ विधी म्हणजे यज्ञ संपन्न करण्यासाठीची शास्त्रीय पद्धत

८. यज्ञमंत्र म्हणजे यज्ञ करताना ज्या मंत्राने होमकुंडात अग्नीला प्रत्येक वेळी हवनीय अर्पण केले जाते अथवा आहुती दिली जाते तो मंत्र.

९. यज्ञफल म्हणजे या यज्ञातून आपल्याला अपेक्षित असलेली प्राप्ती

यज्ञ हा अनेक कारणांसाठी केला जातो आणि त्याच्या उद्दिष्टाप्रमाणे होमकुंडाचा आकार, देवता, हवनीय, मंत्र आणि हवन पद्धत बदलते. यज्ञाचे करण्याचे कारण, मनातील कोणतीही वैयक्तिक /सामुदायिक इच्छा, संतती, ग्रहपीडा, रोगपरिहार, संकट विमोचन, जनकल्याण, वैश्विक शांती असे कोणतेही असले तरी त्यातून वातावरणाची शुद्धी होते हे अलीकडच्या शास्त्रोक्त प्रयोगातून सिद्ध झाले आहे.

आता आपण आपल्या विषयाकडे वळूया. यज्ञ ही अतिशय पवित्र संकल्पना आहे हे आपल्या लक्षात आले असलेच. या संकल्पनेचा उपयोग आणि तुलना आपल्या स्वातंत्र्य लढ्यासाठी केली आहे. या ठिकाणी भारतमाता ही देवता, आपला संपूर्ण देश हे होमकुंड, देशभक्तांचे पंचप्राण हे हवनीय, भारत माता की जय, वंदे मातरम्, चले जाव, इन्किलाब झिंदाबाद, हे यज्ञ मंत्र, अनेक आंदोलने, मोर्चे, चळवळ, असहकार, सत्याग्रह, ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र बंड, हा यज्ञ विधी आणि देशाचे स्वातंत्र्य हे यज्ञ फल, असा एक मोठा यज्ञ त्यावेळी मांडला गेला होता.

यज्ञात हवन द्रव्याची आहुती देवून ज्याप्रमाणे यज्ञदेवता प्रसन्न होवून, आपली मनोकामना पूर्ण व्हावी यासाठी प्रयत्न केले जातात, त्याप्रमाणे भारतमाता ही देवता मानून तिच्या स्वातंत्र्य प्राप्ती अथवा असाच देशहिताचा दिव्य हेतू मनात धरून, ज्यांची देशरूपी होमकुंडात जाणून बुजून आपल्या प्राणाची आहुती अथवा बलिदान दिले आहे, म्हणजे हौतात्म्य पत्करले आहे अशा पुण्यवान आत्म्यांना हुतात्मा असे म्हटले जाते. थोडक्यात देशासाठी हौतात्म्य पत्करतो तो हुतात्मा असे म्हणता येईल.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक शूरवीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. या वीरांनी ज्या दिवशी असे समर्पण केले त्यांचे पुण्य स्मरण करण्यासाठी जो दिवस साजरा केला जातो, त्याला हुतात्मा दिन असे म्हणतात.

राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या स्मरणार्थ ३० जानेवारी हा दिवस प्रामुख्याने हुतात्मा दिन म्हणून, राष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. या बरोबरच राज्य पातळीवर, शहर अथवा ग्राम अशा स्थानिक पातळीवर सुद्धा, त्या त्या ठिकाणच्या शूरवीरांचे पुण्यस्मरण करण्यासाठी असाच हुतात्मा दिन साजरा होतो. याची काही उदाहरणे बघुयात.

१९३० साली महात्मा गांधींनी स्वेदेशी चळवळ उभारली. यामुळे सर्वत्र आंदोलने सुरु झाली. त्यावेळी मुंबईला एका ट्रक मधून परदेशी कापड जाणार होते हे कळल्यावर, बाबू गेनू सैद आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तो अडवला.

पोलिसांनी त्यांना हटवण्याचा प्रयत्न केला परंतु ते तरी हटले नाहीत, त्यावेळी तिथल्या ब्रिटिश सार्जंटने निर्दयपणे ट्रक पुढे नेला त्यात वयाच्या फक्त २२ व्या वर्षी बाबू गेनू चिरडले गेले. तो दिवस १२ डिसेंबर १९३०, स्वातंत्र्य चळवळीतील ते पहिले हुतात्मा ठरले. त्यांची स्मृती जागवण्यासाठी मुंबईतल्या परळला एक पुतळा याबरोबर काळबादेवीला त्यांच्या नावाने एक रस्ता आहे. तसेच पुण्यातल्या एका चौकाला बाबू गेनू यांचे नाव दिले गेले आहे. १२ डिसेंबर हा दिवस तिथे हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो.

शिवराम हरी राजगुरु यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील खेड येथे १९०८ साली झाला. तर भगतसिंग यांचा १९०७ चा. जालियनवाला बाग हत्याकांडाविरुद्ध लाला लजपतराय यांनी आंदोलन उभे केले होते. त्यात झालेल्या लाठीमारात त्यांची आहुती पडली. त्यामुळे शिवराम हरी राजगुरू आणि भगतसिंग यांनी त्यांना मारणाऱ्या स्कॉटच्या बदला घेत असताना, तावडीत सापडलेल्या सॉंडर्स या पोलिसाला लाहोर मध्ये, राजगुरूंनी अचूक वेध घेत टिपलं. उर्वरित गोळ्या भगतिसंग याने झाडून त्याला ठार केलं. पुढे राजगुरू यांना अटक करण्यात आली.

सुखदेव थापर यांचा जन्म लायलपूर मध्ये १९०७ मध्ये झाला. भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी असेंब्लीमध्ये बॉम्ब टाकल्यानंतर सुरु झालेल्या छापे सत्रात काही बॉम्ब जप्त करण्यात आले. सुखदेव यांनी ते तयार केले होते म्हणून त्यांना अटक करण्यात आली. पुढे भगतसिंग यांनाही अटक झाली. शेवटी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु या तिघांनाही २३ मार्च १९३१ ला फाशी देण्यात आले. हाही दिन हुतात्मा दिन म्हणून साजरा होतो. काही वर्षांनी राजगुरु नगर असे करण्यात आले.

पालघर जिल्ह्यातील पालघर, वसई आणि जव्हार या भागातील सन १९४२ च्या चले जाव आंदोलनामध्ये १४ ऑगस्ट १९४२ रोजी चा उठाव झाला. याही आंदोलनात ब्रिटिशांनी गोळीबार केला, ज्यात पालघर तालुक्यातले पाच शूरवीर शहीद झाले. त्यांची स्मृती म्हणून पालघर शहरांमध्ये हुतात्मा चौक उभारलेला आहे आणि तो दिवस तिथे हुतात्मा दिन म्हणून साजरा होतो.

१९४२ मध्ये महात्मा गांधींनी ब्रिटिशांविरुद्ध चलेजाव आंदोलन छेडले. त्याला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. खानदेशातील नंदुरबार येथे लोकांनी काढलेल्या मोर्चामध्ये पोलिसांनी गर्दी पांगवण्याचा प्रयत्न केला. परंतु हातात निशाण असलेल्या शिरीष कुमार मेहता या फक्त १६ वर्षीच्या युवकाने मागे हटण्यास नकार दिला. त्यामध्ये झालेल्या गोळीबारात शिरीष कुमार ठार झाला. तो दिवस ९ नोव्हेंबर १९४२. नंदुरबार येथे त्याच्या नावाने स्मारक उभारले गेले आहे आणि तो दिवस तिथे हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो.

स्वातंत्र्य प्राप्ती बरोबर इतर कारणांनी हौतात्म्य पत्करलेल्या शूरवीरांचा दिवस हा सुद्धा या संदर्भात हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. याची काही उदाहरणे बघुयात.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी अक्साई चीनच्या दुर्गम भागात, सोळा हजार फुटांवर असलेल्या हॉट स्प्रिंग या ठिकाणी, सी आर पी एफ पोलीस सब इन्स्पेक्टर किरण सिंग यांच्या नेतृत्वात गस्त घालत असलेल्या, आपल्या जवानांवर चिनी सैनिकांनी अचानक हल्ला चढवला. यात त्यांनी अतिशय शौर्याने शत्रूविरूद्ध लढा दिला. परंतु या हल्यात आपल्या १० जवानांना वीरमरण आलं. या जवांनांच्या हौतात्म्याचे स्मरण म्हणून, दरवर्षी २१ ऑक्टोबरला प्रत्येक प्रांताचे प्रतिनिधित्व करणारे पोलिस अधिकारी, आणि कर्मचाऱ्यांकडून हा दिवस, पोलीस शहीद दिन म्हणून साजरा केला जातो.

महाराष्ट्राचा विचार करायचा झाला तर, १९५० ते १९६० या कालखंडामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अनेक आंदोलने आणि मोर्चे निखाले. यांच्यावर पोलिसांचा गोळीबार होऊन त्यात एकूण १०७ लोकांना वीर मरण आले. १ मे १९६० या रोजी हा लढा यशस्वी झाला आणि मुंबईसह महाराष्ट्र एक झाला. म्हणून हा दिवस महाराष्ट्र दिन आणि हुतात्मा दिन म्हणूनही पाळला जातो. या १०७ हुतात्म्यांच्या स्मरणासाठी मुंबईला फ्लोरा फाउंटन येथे हुतात्मा स्मारक उभारले गेले आहे.

१ नोव्हेंबर १९९० ला अयोध्येमध्ये शहीद झालेल्या कार सेवकांची स्मृती जपण्यासाठी प्रत्येक वर्षी १ नोव्हेंबरला हुतात्मा दिन पाळला जातो.

आता आपण आपण देशामध्ये हुतात्मा दिन कसा साजरा केला जातो ते बघुया.

त्या दिवशी त्या हुतात्म्यांचे स्मारक धुवून स्वच्छ केले जाते. परिसरातही साफसफाई केली जावून रांगोळी घातली जाते. या बरोबरच या स्मारकाची अथवा पुतळ्याची फुलांनी सजावट केली जाते. यानंतर कोणातरी मान्यवरांच्या हातून पूजा करून हार घातला जातो, ओवाळलेही जाते. या निमित्ताने त्या हुतात्म्याविषयी जमलेल्या लोकांना माहिती सांगितली जाते. लाऊड स्पीकर वरून देशभक्तीपर गीते लावली जातात. विद्यार्थ्यांसाठी निरनिराळ्या स्पर्धा आयोजित करून त्यांना बक्षिसेही दिली जातात. कधीकधी त्या हुतात्म्यांच्या वंशजांना त्या ठिकाणी आदराने पाचारण करून, त्यांचा यथोचित सन्मान करून त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त केला जातो.

काही ठिकाणी त्या हुतात्म्यांची प्रतिमा गाडीवर, पालखीत अथवा रथावर ठेवून ती गावात मिरवली जाते. वाटेत सुवासिनी ओवाळतात, पुष्पवृष्टी सुद्धा केली जाते. लोकांना प्रसाद म्हणून बत्तासे, पेढे, लाडू इत्यादी वाटले जातात. या दिवशी हुतात्म्यांच्या नावाने सार्वजनिक वाचनालय अथवा एखादा समाजपयोगी उपक्रम सुरू केला जातो.

त्या हुतात्म्यांने आपल्या इच्छित कार्यासाठी प्रसंगी स्वतःचे रक्त सांडले असते, म्हणून बहुतेक ठिकाणी या दिवशी रक्तदान कार्यक्रमाचे आयोजन केले जाते आणि जमलेले रक्त स्थानिक रक्तपेढी कडे सुपूर्द केले जाते. एकंदरीत या हुतात्म्यांची स्मृती चिरंतन जपण्यासाठी छोट्यातल्या छोट्या गावात सुद्धा, काही ना काही कार्यक्रम आयोजित केला जातो.

आपल्या भारतमातेसाठी प्राणार्पण करणाऱ्या अशा सर्व हुतात्म्यांचे त्या त्या दिवशी पुण्यस्मरण करुया आणि त्यांना आदरांजली वाहून आपणही तो दिवस प्रेरणा दिन म्हणून साजरा करूया.

**अविनाश हळबे**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# आण्विक पाणबुडी - SSBM S4*

भारताच्या चौथ्या आण्विक पाणबुडी SSBM S4* चे गेल्याच आठवड्यात जलावतरण झाल्याची मोठी बातमी भारतीय नौसेना उपप्रमुख, व्हाईस ॲडमिरल कृष्णस्वामीनाथन यांनी नवी दिल्लीतील पत्रकार परिषदेत सांगितली. भारताची समुद्रशक्ति वाढत आहे हे सर्व जगाला विदित आहेच. आण्विक पाणबुडी SSBM S4* ही अरिहंत वर्गातील चौथी स्वदेशी आण्विक पाणबुडी आहे. (SSBN = Ship, Submersible, Ballistic, Nuclear) जिचे जलावतरण, जहाज बांधणी केंद्र विशाखापट्टण येथे करण्यात आले. या बांधणी मध्ये मोठा वाटा भारतीय उद्योगांचा, असून ते 'आत्मनिर्भर भारत' चे भक्कम उदाहरण आहे. मोदी सरकारचे आत्मनिर्भर भारत हे मिशन मोड मध्ये काम सुरु असून त्यासाठी कधीच निधी कमी पडू दिला जात नाही आणि हेच मोदी सरकारचे बलस्थान आहे. त्या मुळेच भारताची वाटचाल आर्थिक महासत्तेकडेही जोमाने सुरु आहे. त्याच बरोबर निदान संरक्षण क्षेत्रात तरी परकीय शक्तींवर अवलंबून राहायला नको ही जमेची बाजू. त्याचबरोबर संरक्षण सामुग्री व शस्त्रास्त्रे यांच्या स्वदेशी उत्पादनांना दिलेले प्राधान्य ही सामरिक महत्त्वाची गोष्ट साध्य होतेय. विशेषत: इंडो–पॅसिफिकमध्ये आपली सागरी सुरक्षा बळकट करण्यावर भारताचा भर आहे.

भारतीय नौदलाच्या सेवे मधे सध्या पहिल्या दोन आण्विक पाणबुड्या आहेत. तिसऱ्या पाणबुडीच्या समुद्री चाचण्या सुरू असून पुढच्या वर्षी ती सेवेमध्ये संमिलित होईल. पहिली पाणबुडीची वाच्यता न करता ऑगस्ट २०१६ मध्ये ती नौसेनेमध्ये सामावून घेतली. ही पाणबुडी ६००० टन पाण्याचे

विस्थापन करणारी, या पाणबुडी साठी ८३ चथ क्षमते च्या दाबयुक्त हलके पाणी अणुभट्टी (pressurised light-water reactor) सक्षम युरेनियम (enriched uranium) इंधनाचा उपयोग केला जातो. ही पाणबुडी सध्या ७५० किमी पल्ला असणारे, पाण्याखालून डागता येणारे बॅलेस्टिक क्षेपणास्त्र SLBM K-15 यांनी शस्त्र सज्ज आहे.

१९८३ च्या दरम्यान स्वदेशी आण्विक पाणबुडी तंत्रज्ञान विकसित करून पाणबुडीचे आरेखन, अभिकल्पन व बांधणी करण्याची योजना ATV (Advanced Technology Vessle) बनवली व ते काम २५ वर्षांनंतर पूर्ण झाले. आण्विक पाणबुडी मुळे भारताच्या 'आश्वासक न्यूनतम अण्वस्त्र संपन्नता आणि शक्ति संतुलन' (Credible Minimum Nuclear Deterrent) साठी तीन पैकी एक महत्वाचा मार्ग सिद्ध झाला आहे. अण्वस्त्रे डागणारी/अण्वस्त्रे सज्ज पाणबुडी तयार करून हा ही एक टप्पा पूर्ण केला आहे.

आश्वासक न्यूनतम अण्वस्त्र संपन्नता आणि शक्ति संतुलन साधण्या साठी भारताने १९९८ च्या मे महिन्यात अण्वस्त्रांच्या पाच यशस्वी चाचण्या केल्या आणि भारत अण्वस्त्रधारी देश बनला. अणूबॉम्ब, हायड्रोजन बॉम्ब, लघु अणूबॉम्ब साठीचे सर्व तंत्रज्ञान विकसित करून ते आत्मसात केल्याचे म्हणजे अणु–विखंडन आणि अणु–संमीलन तंत्रज्ञान (Fission Fusion Technology) विकसित करून सिद्ध केल्याचे जगाला दाखवले.

अणुबॉम्ब/अण्वस्त्रे आहेत पण ते शत्रूलक्ष्यावरी मारा करण्यासाठीची यंत्रणा (Delivary System) सुद्धा आवश्यक असतात. भारताने तीन महत्वाचे मार्ग ठरवले.

पहिला मार्ग म्हणजे लढावू विमानाद्वारे ड्रॉप बॉम्ब (Drop Bomb) च्या स्वरूपात अण्वस्त्रे डागण्याची क्षमता विकसित केली आहेच.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

दुसरा मार्ग म्हणजे क्षेपणास्त्र प्रणाली द्वारे अण्वस्त्रे डागण्याची क्षमता विकसित केली. डॉ कलामांच्या नेतृत्वामधे भारताने अग्नी क्षेपणास्त्रे मालिका विकसित करून हे दोन्ही महत्वाचे मार्ग पूर्ण केले होते.

तिसरा मार्ग म्हणजे आण्विक पाणबुडीच्या माध्यमातून अण्वस्त्रे डागण्याची क्षमता विकसित केली. भारताने पाणबुडीवरून डागण्यात येणाऱ्या क्षेपणास्त्रांना ‘K-series’ म्हणजेच डॉ. कलामांच्या सन्मानार्थ मफ्घ्र हे नाव दिले आहे.  ही क्षेपणास्त्रे आपल्या अरिहंत वर्गाच्या पाणबुडीवरून डागण्याची यंत्रणा निर्माण केली आणि आता हा तिसरा मार्गही प्रशस्त केला आहे.

भानौपो–अरिहंत (भारतीय नौसेना पोत – INS Indian Naval Ship) व  भानौपो–अरिघात या दोन्ही पाणबुड्या भारतीय नौसेनेच्या सेवेत आहेत. अण्विक पाणबुडीचा विकास व निर्माण हे DRDO, BARC, Navy, DPSU, आणि खाजगी उद्योग यांच्या एकत्रित सुदृढ प्रयत्नांतून साकार झाले असून गेल्या वर्षात आत्मनिर्भर भारत चे यशस्वी उदाहरण झाले आहे. तिसरी आण्विक पाणबुडी भानौपो–अरिदमन (INS Aridhaman) जिच्या सध्या समुद्री चाचण्या सुरु असून पुढील वर्षी ती नौसेनेच्या सेवेत दाखल होईल.

SSBM S4* भारताच्या चौथ्या आण्विक पाणबुडी ही आधीच्या दोन्ही पाणबुड्यांपेक्षा अधिक मजबूत, सुरक्षित आणि खात्रीपूर्वक बदला घेण्याची क्षमता असणारी पाणबुडी आहे. आधीच्या पाणबुडीपेक्षा SSBN-S4* ही अधिक मोठी, सुधारीत अणुभट्टीसह, अनेक क्षेपणास्त्रे धारण क्षमता आणि अधिक चांगले स्टील्थ तंत्रज्ञान असणार आहे. ६ X ५३३ mm टॉर्पेडो ट्यूब, 4 VLS (Verticle Launch System) मधून K-15 SLBM² प्रकारची १२ क्षेपणास्त्रे किंवा K-4 SLBM² प्रकारची ४ क्षेपणास्त्रे अण्वस्त्रे डागण्याची क्षमता विकसित केली.

INS अरिहंत ७५० किमी पल्ल्याच्या K-15 आण्विक क्षेपणास्त्रांचे वहन करते, तर S4* मध्ये ३,५०० किमी पल्ल्याचे प्रगत K-4 SLBM² आहे ज्याची २०२० मध्ये प्रथम चाचणी घेण्यात आली होती. ही क्षेपणास्त्रे प्रगत उभ्या प्रणालींद्वारे प्रक्षेपित करण्यासाठी डिझाइन केलेली आहेत, पाणबुडीची परिचालन क्षमता आणि धोरणात्मक प्रतिकार वाढवतात.

S4* हे त्याच्या पूर्ववर्तींमधील एक महत्त्वपूर्ण अपग्रेड आहे आणि भारतच्या क्रेडिबल मिनिमम डेटरन्स (CMD) धोरणात योगदान देते.

**काशीनाथ देवधर**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# संस्कार/नैतिक मूल्य शिक्षा कक्षाएँ : आधुनिक शिक्षा की कमी का समाधान

**आज मूल्यों का महत्व पहले से अधिक क्यों है।**

आज की शिक्षा प्रणाली में अंकों और नौकरी पर अधिक ध्यान दिया जाता है, जबकि मूल्यों पर कम। इसके कारण नैतिक मूल्यों, ईमानदारी, सत्यनिष्ठा और जीवन कौशल में गिरावट आ रही है। विद्यार्थियों में भावनात्मक मजबूती, नागरिक जिम्मेदारी और वास्तविक जीवन की चुनौतियों से निपटने की क्षमता की कमी देखी जाती है।

पहले संयुक्त परिवार, शिक्षक और समाज के माध्यम से बच्चों को स्वाभाविक रूप से मूल्य सीखने को मिलते थे, लेकिन आज छोटे परिवारों और व्यस्त जीवनशैली के कारण यह व्यवस्था कमजोर हो गई है। साथ ही, तकनीक और सोशल मीडिया के अत्यधिक उपयोग से बच्चे नकारात्मक प्रभावों के संपर्क में आ रहे हैं, जिससे सही और गलत में अंतर करना कठिन हो जाता है।

एक और बड़ी चिंता है मानवीय संबंधों में कमी। बढ़ते स्क्रीन टाइम के कारण आमने-सामने संवाद घट गया है, जिससे भावनात्मक जुड़ाव, सहानुभूति और धैर्य कमजोर हो रहे हैं। अब यह एक गंभीर समस्या बनती जा रही है-तो इसका समाधान क्या है?

**इन सभी समस्याओं का समाधान मजबूत नैतिक मूल्य शिक्षा में है।**

हिंदू संस्कृति विश्व की सबसे प्राचीन और समृद्ध संस्कृतियों में से एक है, जो धर्म (कर्तव्य), कर्म (सही कार्य), सत्य, सम्मान और सामंजस्य जैसे मूल्यों पर आधारित है। यह प्रकृति के साथ संतुलन में जीना सिखाती है और विविधता में एकता को बढ़ावा देती है, साथ ही परिवारिक संबंध, बड़ों का सम्मान और आध्यात्मिक विकास पर जोर देती है।

हिंदू मूल्य शिक्षा इन सिद्धांतों को आगे बढ़ाते हुए सभी जीवों के प्रति करुणा, अहिंसा, आत्म-अनुशासन और अच्छे चरित्र का विकास करती है, जिससे व्यक्ति जिम्मेदार और नैतिक जीवन जी सके। परंपराएँ, त्योहार और संस्कार इन मूल्यों को एक पीढ़ी से दूसरी पीढ़ी तक पहुँचाते हैं।

हमारी महाकाव्य कथाएँ जैसे रामायण और महाभारत इन मूल्यों को और मजबूत बनाती हैं। ये सत्य, कर्तव्य, साहस और धर्म के प्रेरणादायक उदाहरण प्रस्तुत करती हैं, जिससे बच्चे इन मूल्यों को सरल और प्रभावी तरीके से समझ पाते हैं।

नैतिक मूल्य शिक्षा बहुत कम उम्र से ही दी जानी चाहिए, क्योंकि बचपन व्यक्ति के चरित्र निर्माण का सबसे महत्वपूर्ण समय होता है। इस दौरान बच्चे अपने आसपास के वातावरण, माता-पिता और शिक्षकों से आसानी से सीखते हैं। प्रारंभिक नैतिक शिक्षा बच्चों में सहानुभूति, जिम्मेदारी और अच्छे व्यवहार का विकास करती है, जो एक अच्छे इंसान और जिम्मेदार नागरिक बनने के लिए आवश्यक है। इसलिए बचपन से ही नैतिक मूल्यों का विकास करना एक बेहतर समाज के निर्माण के लिए अत्यंत आवश्यक है।

छोटे और एकल परिवारों में नैतिक मार्गदर्शन की भूमिका और भी महत्वपूर्ण हो जाती है। संयुक्त परिवारों के विपरीत, जहाँ कई बड़े मिलकर बच्चे का मार्गदर्शन करते हैं, छोटे परिवारों में समय की कमी के कारण यह संभव नहीं हो पाता। ऐसे में

विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!

**जनता वेल्फेअर सोसायटी**

संस्कार वर्ग बच्चों के व्यक्तित्व और चरित्र निर्माण में महत्वपूर्ण भूमिका निभाते हैं।

**बच्चे सीखते समय आनंद भी लेंगे।**

संस्कार वर्ग के मुख्य घटक (५ से १४ वर्ष के बच्चों के लिए):

* शारीरिक – खेल/योग
* बौद्धिक चर्चा
* सामाजिक एवं आध्यात्मिक विकास
* कहानियाँ एवं गीत
* कला एवं हस्तकला
* शैक्षणिक भ्रमण आदि

यह कार्य सप्ताहांत में, सप्ताह में एक घंटे, ५ से १४ वर्ष के बच्चों के लिए संस्कार कक्षाएँ शुरू करके किया जा सकता है। ये कक्षाएँ प्रत्येक हाउसिंग सोसायटी, विद्यालय और मंदिर में, समाज के स्वयंसेवकों और अभिभावकों के सहयोग से आयोजित की जा सकती हैं।

नैतिक मूल्य सिखाने के कई प्रभावी तरीके हैं। उदाहरण द्वारा शिक्षा सबसे प्रभावी होती है, क्योंकि बच्चे बड़ों का अनुकरण करते हैं। कहानी और वास्तविक जीवन के अनुभव इसे और रोचक बनाते हैं।

मजबूत मूल्यों के साथ पले–बढ़े बच्चे जिम्मेदार नागरिक बनते हैं, जो कानून का सम्मान करते हैं, दूसरों के साथ न्यायपूर्ण व्यवहार करते हैं और समाज में सकारात्मक योगदान देते हैं। नैतिक मूल्य पारिवारिक संबंधों और सामाजिक सौहार्द को भी मजबूत बनाते हैं। दीर्घकाल में ये एक स्थिर और प्रगतिशील समाज के निर्माण के लिए आवश्यक हैं।

**निष्कर्ष**

नैतिक मूल्य शिक्षा केवल महत्वपूर्ण ही नहीं, बल्कि आज के समय में अनिवार्य है। यह बदलती पारिवारिक संरचना और तकनीकी प्रभाव के बीच संतुलन बनाकर बच्चों को सही दिशा प्रदान करती है। माता–पिता, शिक्षक और समाज की यह संयुक्त जिम्मेदारी है कि वे इन मूल्यों का विकास करें। निरंतर अभ्यास से यह शिक्षा ऐसे व्यक्तित्व का निर्माण करती है जो सफल होने के साथ–साथ संवेदनशील, अनुशासित और जिम्मेदार नागरिक बनते हैं।

इन कदमों को अपनाकर हम सभी मिलकर एक सशक्त और मूल्य–आधारित समाज का निर्माण कर सकते हैं।

**माधवी सौंशी**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# बुद्ध पौर्णिमा - शांतता, समता आणि मानवतेचा संदेश!

भारतासह जगभरात साजरा केला जाणारा सण म्हणजे बुद्ध पौर्णिमा! हा बौद्ध धर्मातील सर्वात पवित्र सण मानला जातो. हा दिवस गौतम बुद्ध यांच्या जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण या तिन्ही महत्त्वाच्या घटनांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.

वैशाख महिन्यातील पौर्णिमेला येणारा हा सण मानवजातीला शांती, करुणा आणि समतेचा संदेश देतो. या सणाचे औचित्य साधून लोक गौतम बुद्ध यांनी दिलेला अहिंसा, करुणा, सत्य आणि मध्यम मार्ग यांचा संदेश स्मरून तो दिवस आत्मचिंतनाचे प्रतीक समजतात.

गौतम बुद्ध यांचा जन्म लुंबिनी म्हणजेच आजचे नेपाळ येथील राजा शुद्धोधन (शाक्य गणराज्याचे राजा) व आई माया देवी यांच्या पोटी सुमारे इ. स. पूर्व ५६३ मध्ये झाला. राजघराण्यात वाढलेल्या सिद्धार्थ गौतम यांना आयुष्यात कोणत्याही प्रकारचे दुःख दिसू नये याची काळजी घेतली गेली होती. मात्र, एकदा त्यांनी राजवाड्याच्या बाहेर पडून वृद्ध, आजारी मनुष्य, मृत व्यक्ती आणि संन्यासी अशी चार दृश्ये पाहिली आणि त्यांना जीवनातील दुःखाचे वास्तव समजले. त्यानंतर त्यांनी राजसुखाचा त्याग करून सत्याच्या शोधासाठी प्रवास सुरू केला. वयाच्या २९व्या वर्षी त्यांनी घर सोडले त्यालाच महाभिनिष्क्रमण असेही संबोधले जाते.

अनेक वर्षे त्यांनी कठोर तपस्या केली, पण त्यातून समाधान मिळाले नाही. शेवटी त्यांनी मध्यम मार्ग निवडला व अनेक वर्षांच्या तपश्चर्येनंतर बोधगया येथे बोधी वृक्षाखाली ध्यान करताना त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते सिद्धार्थ गौतम असे न राहता बुद्ध म्हणून ओळखले जाऊ लागले.

गौतम बुद्धांनी धर्मप्रसार करताना आपला पहिला उपदेश सारनाथ येथे दिले. त्यांनी चार आर्य सत्य आणि अष्टांग मार्ग यांचा उपदेश केला. बुद्धांनी आपल्या उपदेशातून जगाला अहिंसा, करुणा, सत्य आणि मध्यम मार्ग यांचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की, जीवनात दुःख आहे, त्याचे कारण आहे तसेच ते दूर होऊ शकते आणि त्यासाठी एक योग्य मार्ग आहे आणि तो मार्ग म्हणजे अष्टांगिक मार्ग! गौतम बुद्ध यांच्या शिकवणीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या संदेश आणि ज्ञानामध्ये कोणत्याही प्रकारचा अंधविश्वास नाही; तर विवेक, विचार आणि नैतिक मूल्यांना महत्त्व दिले गेले आहे.

त्यामुळे बुद्ध पौर्णिमेचा सण केवळ धार्मिक श्रद्धेपुरता मर्यादित न राहता त्याला सामाजिक महत्त्वही आहे.

- **बुद्ध पौर्णिमेचे सामाजिक महत्त्व :**

**१) समानता आणि बंधुभाव. :-**

बुद्धांनी जात-पात, भेदभाव नाकारला.त्यामुळे सर्व माणसे समान आहेत हा संदेश समाजात पसरतो. आणि समाजात एकता आणि बंधुभाव वाढतो.

**२) अहिंसा आणि शांतता :-**

बुद्धांनी अहिंसेचा मार्ग दिला त्यामुळे समाजात हिंसा कमी होऊन शांतता व सौहार्द निर्माण होते. म्हणूनच ते शांतीचे प्रतीक आहे.

**३) करुणा आणि दयाभाव :-**

गरजूंना मदत करणे, दान देणे यावर त्यांनी भर दिला, त्यामुळे समाजात मानवता आणि सहानुभूती वाढते.


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**४) अंधश्रद्धा कमी करणे :–**

बुद्धांनी विवेक आणि विचारसरणी यावर भर दिला त्यामुळे लोकांची अंधश्रद्धा कमी होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन वाढतो.

**५) नैतिक मूल्यांचा विकास :–**

बुद्धांनी धर्मप्रसारात सत्य, संयम, प्रामाणिकपणा यांचा प्रचार केला. जेणेकरून समाज हा अधिक नैतिक आणि जबाबदार असेल.

**६) सामाजिक सुधारणा :–**

बुद्धांनी समाजातील वाईट प्रथा दूर करण्याची प्रेरणा दिली. स्त्री–पुरुष समानता आणि शिक्षणाला प्रोत्साहन दिले व समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले.

- **बुद्ध धर्माचा प्रसार:–**

बुद्ध धर्म हा साधारण २५०० वर्षे पासून चालत आलेला आहे. प्राचीन काळापासून म्हणजेच इ. स. पूर्व ६ व्या शतकात बुद्धांनी बुद्ध धर्माची स्थापना केली. बुद्धांनी आपले उपदेश बिहार, उत्तर प्रदेश भागात दिले व त्यांच्या मृत्यूनंतर बौद्ध संघटनांनी धर्माचा प्रसार केला. मौर्यकालीन सम्राट अशोक यांनी बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रचार केला. बौद्ध धर्म भारताबाहेर (श्रीलंका, चीन, जपान) पसरवला. काही कालांतराने भारतात बौद्ध धर्माचा प्रभाव कमी झाला होता; परंतु, आधुनिक काळात २०व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले व नवसंजीवनी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमी येथे बौद्ध धर्म स्वीकारला. बौद्ध धर्म स्वीकारून त्यांनी दलित समाजाला नवी ओळख आणि आत्मसन्मान दिला. आंबेडकरांनी हा धर्म स्वीकारून समाजात समानता आणि न्यायाची नवी चळवळ उभी केली.

म्हणूनच हा सण साजरा करताना बुद्धांच्या शिकवणीचा पालन करून लोक एकमेकांशी प्रेमाने वागतात, गरजूंना मदत करतात आणि दानधर्म करतात. बौद्ध विहारांमध्ये प्रार्थना, ध्यान आणि धम्म प्रवचनांचे आयोजन केले जाते. बुद्धांच्या मूर्तींना फुले अर्पण करून, दिवे लावून त्यांचा सन्मान केला जातो. काही ठिकाणी बुद्धांच्या जीवनावर आधारित मिरवणुका काढल्या जातात.

या सणाचा मुख्य संदेश म्हणजे सर्व प्राणी सुखी होवोत. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात बुद्धांचा शांततेचा संदेश अत्यंत महत्त्वाचा ठरतो. समाजात वाढत चाललेली हिंसा, द्वेष आणि असहिष्णुता यांना आळा घालण्यासाठी बुद्धांचे विचार मार्गदर्शक ठरतात. त्यांचा मध्यम मार्ग आपल्याला अतिरेक टाळून संतुलित जीवन जगण्याची शिकवण देतो.

बुद्ध पौर्णिमा आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देते. आपण आपल्या वागणुकीत किती प्रामाणिक, दयाळू आणि संयमी आहोत, याचा विचार करण्याची ही योग्य वेळ आहे. बुद्धांनी दिलेल्या शिकवणींचा अवलंब करून आपण स्वतःचे आणि समाजाचे जीवन अधिक सुंदर बनवू शकतो.

आजच्या आधुनिक युगातही बुद्धांचे विचार तितकेच उपयुक्त आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच मानवतेची जपणूक करणे आवश्यक आहे. बुद्ध पौर्णिमा हा सण आपल्याला याची आठवण करून देतो की, खरे सुख बाह्य गोष्टींमध्ये नसून आपल्या अंतर्मनातील शांतीत आहे.

बुद्ध पौर्णिमा हा केवळ एक सण नसून तो मानवतेचा उत्सव आहे. गौतम बुद्ध यांच्या शिकवणींमुळे आपण शांत, समतावादी आणि करुणामय समाज निर्माण करू शकतो. त्यामुळे या सणाचा खरा अर्थ समजून घेऊन त्यानुसार आचरण करणे हीच खरी बुद्धांना आदरांजली ठरेल.

**ॲड. स्वाती जेरे, नाशिक**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

# श्रीगुरू नानकदेव चरित्र आणि तत्त्वज्ञान

आपल्या भारतात अनेक धर्म, जाती, जमाती आहेत. त्यापैकी शीख धर्माचे संस्थापक श्रीगुरू नानकदेव असे महान संत होते ज्यांनी मानवतेचा, समानतेचा आणि सत्याचा संदेश दिला. आपल्या उच्च विचारांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि धार्मिक भेदभाव दूर करण्याचा प्रयत्न केला. शिखांचा एक अत्यंत शिस्तबद्ध समाज निर्माण केला. ते केवळ धार्मिक गुरु नव्हते, तर एक महान समाजसुधारकही होते.

त्यांचा जन्म वैशाख शुद्ध तृतीया दि. १५ एप्रिल १४६९ रोजी पंजाब मधील तळवंडी (पश्चिम पाकिस्तान) या गावात, वडील काळू आणि आई त्रिप्तादेवी यांच्या पोटी झाला. लहानपणापासूनच नानक अत्यंत तेजस्वी, दयाळू, विचारशील, शांत आणि आध्यात्मिक प्रवृत्तीचे होते. दारावर येणाऱ्या याचकाला तो घरात हाताला लागेल ती वस्तू देऊन टाकत. पाठशाळेमध्ये त्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी त्यांचे शिक्षक आश्चर्यचकित होत. संस्कृत शिकण्यासाठी वडिलांनी त्यांना पंडित रजनात यांच्याकडे पाठवले. परंतु तिथे त्यांचे मन न लागल्याने त्यांच्या वडिलांचे मालक श्री. रायबुलार यांनी नानकांना फारशी भाषा शिकवण्यासाठी पाठवले. परंतु तेथील मौलवींशी मतभेद झाल्याने नान यांनी फारशी शिकणे बंद केले.

नानक ९ वर्षाचे झाल्यावर वडिलांनी या मुलाची मुंज करण्याचे ठरवले. कुलोपाध्याय पंडित हरदयालांनी नानकांच्या गळ्यात जानवे घालण्यासाठी हात पुढे करताच नानकांनी त्यांना थांबवून ते घालण्याचे कारण आणि महत्त्व विचारले. त्यांनी ते सांगितल्यावर स्वतः नानकांनी आदर्श जानवे म्हणजे काय हे शास्त्रोक्त रीतीने सांगितले. ते पाहून घरादारातल्या सर्व लोकांना हा मुलगा सामान्य नसून एक महापुरूष आहे असे वाटू लागले.

थोडे मोठे झाल्यावर मुलगा मार्गी लागावा म्हणून वडिलांनी त्यांना व्यापार करण्यासाठी बाला नावाच्या एका विश्वासू नोकराबरोबर २० रूपये देऊन पाठवले. वाटेत जाताना काही साधूंचे भजन ऐकल्यावर नानक प्रसन्न झाले. परंतु त्यांची भुकेली अवस्था कळल्यावर त्यांनी त्या २० रुपयाची शिधा सामुग्री आणून त्यांना भोजन दिले. रिकाम्या हाताने परत गेल्यावर वडील मारतील या भीतीने, त्यांनी बालाला पुढे पाठवून स्वतः गावाबाहेरील एका झाडावर जाऊन बसले. वडिलांना ही गोष्ट कळताच त्यांनी त्यांना झाडावरून उतरवून मारण्यास सुरूवात केली. तोच श्री रायबुलार हे तिथे तातडीने आले आणि त्यांनी नानकांची सुटका केली, कारण नानक हा दिव्य मुलगा आहे याची त्यांना जाणीव होती.

नानकांची थोरली बहीण नानकी हिचा विवाह सुलतानपूरच्या जयराम यांच्याबरोबर झाला होता. एक दिवशी जयराम नानकांच्या सुलतानपूरला घेऊन गेले. जयराम हे तेथील नवाब दौलतखानाचे दिवाण होते. दौलतखान नानकांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित झाला आणि त्यांनी नानकांना धान्य गोदामामध्ये नोकरी दिली. नानक दयाळू स्वभावाचे असल्यामुळे ते गोरगरिबांना धान्य वाटत. याची चुगली कोणीतरी केल्यानंतर दौलतखानाने गोदामाची तपासणी करण्याचा हुकूम दिला. परंतु तपासणीमध्ये सर्व धान्य आणि हिशेब व्यवस्थित आहेत असे आढळून आले.

नानकांचे मन संसारात रमावे म्हणून घरच्यांनी त्यांचा विवाह त्याच गावातल्या सुलक्षणी यांच्यावर बरोबर करून दिला. ज्यावेळी नानक २९ वर्षाचे होते. दहा वर्ष संसार केल्यानंतर नानकांना २ मुले झाली. एक दिवस नानक स्नानासाठी नदीमध्ये उतरले, परंतु वरती आले नाहीत. परंतु ही घटना कळताच

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

दौलतखानाने कोळ्यांकडून नानकांचा शोध घेतला. नानक सापडले नाहीत. तिसऱ्या दिवशी नानक अकस्मात प्रकट झाले. परंतु आता त्याच्यामध्ये मोठे परिवर्तन झाले होते आणि त्यांच्या मुखातून 'ना कोई हिंदू, ना मुसलमान' याचा अर्थ – सर्व मानव समान आहेत; धर्माच्या नावावर भेद नाही असे शब्द बाहेर पडत होते.

नानकांनी उच्चारलेल्या वाक्यांनी समाजात खूप खळबळ माजली. नवाबाने चिडून नानकांना याचा जाब विचारला. यावेळी नानकांनी खरा मुस्लिम कसा असतो आणि नमाज कसा पढावा याचे त्याला मार्गदर्शन केले ज्याने तो दिपून गेला.

आता नानकांनी आपल्या मानवतावादी कार्यासाठी गृहत्याग करायचे ठरवले. आईवडील आणि मुलांनी त्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला परंतु नानक आपल्या निश्चयावर ठाम राहिले. आपल्या भ्रमंतीमध्ये नानक सर्वत्र मानवता धर्माची शिकवण देत. त्यामुळे अनेक लोक त्यांचे शिष्य झाले. अशी भ्रमंती करत नानक भारतभर फिरले. ते जिथे जिथे गेले तिथे तिथे गुरुद्वारे निर्माण झाली.

विदेशामध्ये नानक तिबेट, मानसरोवर, चीन इत्यादी देशात गेले. चीनमध्ये तर त्यांच्या स्मरणार्थ एका गावाचे नाव नानकिंग असे ठेवण्यात आले. पुढे नानक सौदी अरेबिया, पॅलेस्टाईन, इराक, आफ्रिका याही देशात गेले. नानकांनी बगदादच्या खालीफाला केलेला उपदेश नरसिंहतनामा नामक ग्रंथामध्ये आहे. या काळात नानक मक्केलाही गेले आणि तिथल्या धर्माचाऱ्यांची त्यांची चर्चाही झाली असे सांगितले जाते. या प्रवासात त्यांनी ईश्वर एकच आहे याचा संदेश दिला. सर्व धर्मातील चांगल्या गोष्टींवर भर दिला. स्त्री–पुरुष समानतेचा प्रचार केला.

### श्रीगुरु नानकांची एक चातुर्य कथा

एकदा नानक आपल्या शिष्यपरिवारासह एका गावी पोहोचले जे गाव चोर आणि दुर्जनांचे होते. गावकऱ्यांनी नानकांचे आगत स्वागत तर राहू द्या, परंतु त्यांना त्रास देणे, त्यांच्या वस्तू पळवणे असे उद्योग सुरु केले. निघताना गावातल्या एका सज्जन माणसाने नानकांना प्रणाम करून, हे गाव सुधारावे यासाठी त्यांचा आशीर्वाद मागितला. त्यावर नानकांनी 'तुमच्या गावाची इथल्या इथेच भरभराट होऊ दे' असा आशीर्वाद दिला आणि पुढे गेले.

दुसरे गाव भाविक मंडळींचे होते. त्यामुळे गावाने सर्वांचे स्वागत आणि सत्कार करून त्यांना भोजन प्रसाद पण दिला. निघताना गावच्या पाटलांनी नानकांना गावासाठी आशीर्वाद मागितला. त्यावेळी नानक म्हणाले, ''तुमच्या गावातले लोक देशोधडीला लागू दे!'' असे म्हणून ते शिष्य परिवारासह निघून गेले.

हे विचित्र वाटून, एका शिष्याने त्यांना विचारले की, दुर्जनांच्या गावाला तुम्ही तुमची इथल्या इथेच भरभराट होऊ दे असे म्हणाला आणि या सज्जनांच्या गावाला ते देशोधडीला लागो असा आशीर्वाद दिला, असे कसे?

त्यावेळी हसून नानकांनी उत्तर दिले की दुर्जन असलेल्या गावातले लोक जर इतरत्र गेले तर तीही गावे बिघडवून टाकतील. पण सज्जनांच्या गावातले लोक एकाच गावात राहून उपयोग नाही. त्यांचा सर्व जगाला उपयोग व्हायला हवा. म्हणून मी तिथे देशोधडीला लागावे असा आशीर्वाद दिला. कारण त्यामुळे ही सज्जन मंडळी जिथे जिथे जातील तिथल्या लोकांना सुद्धा सज्जनच बनवतील!

पुढे नानकांचे एक शिष्य लहानाजी उर्फ अंगद त्यांच्या संपर्कात आले. नानकांनी त्यांची अनेक वेळा कठोर परीक्षा घेतली. त्यातून ते उत्तीर्ण झाल्यावर त्यांना स्वतःच्या मुलांना बाजूला ठेवून अंगद यांनाच आपले उत्तराधिकारी म्हणून नेमले.

श्रीगुरू नानक आणि संत नामदेव

आपल्या प्रवासात नानक नागपूर जवळील रामटेक येथेगेले असताना महाराष्ट्रातील संत नामदेवांशी त्यांची भेट होवून एकमेकांच्या सद्विचारांचे आदान प्रदान झाले. इतके की संत नामदेवांचे ६१ अभंग गुरुग्रंथसाहेब मध्ये समाविष्ट केले गेले.

### श्रीगुरु नानक यांचे प्रमुख तत्त्वज्ञान

एक ओंकार – देव एकच आहे. सत्य, प्रामाणिकपणा, निःस्वार्थ सेवा आणि मेहनत यांचे महत्त्व विशेष आहे. नामस्मरण (देवाचे स्मरण), जात, धर्म, लिंग यावर आधारित भेदभावाचा निषेध.

नानकदेव यांनी मेहनतीने काम करणे, निःस्वार्थ सेवा करणे आणि देवाचे स्मरण करणे यावर भर दिला. त्यांनी जातिभेद आणि स्त्री–पुरुष भेदभावाचा तीव्र विरोध केला. समाजात समानता रुजवण्यासाठी त्यांनी लंगर प्रथा सुरु केली, ज्यामध्ये सर्व लोक एकत्र बसून भोजन करतात. यामुळे समानता आणि बंधुता यांचा संदेश पसरला. असा आपल्या ज्ञान आणि सद्विचारांचा प्रसार करत त्यांनी २ सप्टेंबर १५३९ रोजी कर्तारपूर येथे आपला देह ठेवला. पुढे त्यांची परंपरा ९ गुरूंनी चालवली.

१० वे गुरु गोविंदसिंगजी यांनी इ.स. १७०८ मध्ये असे जाहीर केले की, पुढे कोणताही मानवी गुरु नसेल; गुरु ग्रंथ साहेबच शीखांचा अतिंम गुरु असेल. ती परंपरा आजतागायत पाळली जाते.

**शीख समाजाची माहिती**

जगभारातील शीख लोकसंख्या सुमारे २.५ ते ३ कोटी असून, ८०% पेक्षा जास्त शीख भारतात आणि मुख्यतः पंजाब राज्यात आहेत. भारताबाहेर देखील कॅनडा, इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलँड इत्यादींमध्येही शीख मंडळी बहुसंख्येने आहेत.

शीख समाजात खालसा, उदासी, निर्मल यासारखे पंथ/ उपपंथ असले तरी त्यांचे मूळ गुरु ग्रंथसाहिब आणि दहा शीख गुरूंच्या शिकवणीत आहे.

शीख समाजात खालसा, उदासी, निर्मल यासारखे पंथ/ उपपंथ असले तरी त्यांचे मूळ गुरु ग्रंथसाहेब आणि दहा शीख गुरुंच्या शिकवणीत आहे.

शीख पुरुष आणि स्त्रियांचे पेहरावही कोणत्याही कामाला सहजपणे हात घालता येईल असे असतात. त्यामुळे स्त्रियांचा 'पंजाबी ड्रेस' भारतभर नोकरी अथवा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया वापरतात.

एकूण पहाता शीख समाज अत्यंत शिस्तबद्ध, शूर, उद्योगरत, स्वाभिमानी, ७५% साक्षर, समाजमित्र आहे. भारताच्या तिन्ही सैन्यामध्ये साध्या जवानापासून सैन्यदलप्रमुख, उद्योगधंद्यांमध्ये कामगारापासून उद्योगपती पर्यंत, अनेक सरकारी पदांपासून पंतप्रधानांपरर्यंत सर्व ठिकाणी शीख समुदायाच्या व्यक्ती आढळून येतात. हा समुदाय अत्यंत उद्योगप्रिय असून भारतातील सर्वच क्षेत्रात मोठी जबाबदारी आणि कामगिरी पार पाडताना दिसून येतात. आळशी, निरुद्योगी अथवा भीक मागणारा शीख तुम्हाला कधीच आढळणार नाही. गुन्हेगारी मध्ये यांचे प्रमाण आढळत नाही.

**गुरुद्वार –** शिखांच्या धार्मिक उपासना केंद्रास गुरुद्वार म्हणतात. भारतभर शिख समुदायासाठी सुमारे २००० पेक्षा जास्त गुरुद्वारे आहेत. अमृतसरमधील सुवर्णमंदिर उर्फ हरमंदिर साहिब या बरोबरच दिल्ली, चंडीगढ यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये आणि ग्रामीण भागातही गुरुद्वारे आहेत. भारताबाहेर ९०० पेक्षा जास्त गुरुद्वारे आहेत.

**श्रीगुरु ग्रंथसाहिब –** हा शीख धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. ते याला जिवंत गुरु मानतात. नानकांची बाणी म्हणजे उपदेशपर रचना यासह गुरु ग्रंथ साहेबाचे संकलन ५ वे शीख गुरु – गुरु अर्जनदेवजी यांनी इ.स. १६०४ मध्ये केले. हा ग्रंथ गुरुमुखी लिपीत लिहिला आहे. यामध्ये १४३० अंग म्हणजे पाने असून यात शीख गुरुंच्या बाण्यांसोबतच, कबीर, नामदेव, रैदास, शेख फरीद यांसारकख्या संतांचे ५८९४ अभंग अथवा पदे आहेत. यामुळे समजा, मानवता आणि सर्वधर्मसमभाव अधोरेखित होतो.

**भाषा** : पंजाबी, ब्रज, संस्कृत, फारसी इ. असून रचना रागांनुसार म्हणजे संगीतात्मक शैलीत केली आहे.

गुरुद्वाराच्या गर्भगृहात एका लाकडी चौकटीत मोठ्या वस्त्राखाली हे ग्रंथ अत्यंत आदराने ठेवले जातात. त्यांना रोज प्रकाश म्हणजे सकाळी उघडणे आणि सुखासन म्हणजे रात्रीची विश्रांती दिली जाते. पूजक आणि भक्त या ग्रंथातील पदांचे पठन अथवा गायन करतात. नामस्मरण चालू असते. चौकटीबाहेर उभे राहून पंख्याने वाराही घातला जाते. भाविक तेथे प्रसाद, वस्त्रे वगैरे अर्पण करतात. लंगर म्हणजे भोजनगृहात प्रसाद चालूच असतो. एकूण गुरुद्वारातली स्वच्छता आणि टापटीप वाखाणण्यासारखी असते.

**शीख धर्म आणि समर्थ रामदास स्वामी –** श्रीनगरमध्ये शीखांचे सहावे गुरू हरगोविंदजी (१५९५–१६४४) आणि समर्थ रामदास स्वामी (१६०८–१६८२) यांची योगायोगाने भेट झाली. हरगोविंदजी शस्त्रे आणि सैन्यही बाळगत. दोघांची चर्चा चालू असताना समर्थांनी त्यांना 'आपण धर्मगुरू आहात. मग तलवार आणि सैन्य का बाळगता?' असे विचारले. तेव्हा हरगोविंद म्हणाले, 'सध्या यवन अनन्वित अत्याचार करीत आहेत, त्यांचा सामना करण्यासाठी आपण बलसंपन्न आणि शस्त्रसज्ज होवून प्रतिकार केला, तरच आपला आणि आपल्या धर्माचा निभाव लागेल. तो खुलासा पटून समर्थही गुप्ती नावाचे शस्त्र बाळगू लागले. तपश्चर्येसाठी लागणाऱ्या कुबडीच्या आत छोटी तलवार असे. समर्थांची ही कुबडी आजही सज्जनगडावर पहायला मिळते. गुरू हरगोविंद यांनी त्यांना स्वतः शस्त्रसज्ज होवून समाजालाही शस्त्रसज्ज होण्याची प्रेरणा दिली यात संशय नाही.

अशा श्रीगुरु नानकदेव यांना त्रिवार वंदन करून, त्यांच्या शीख धर्माप्रती परम आदर व्यक्त करूया आणि असा समाज आपल्या भारतात आहे याचा अभिमान बाळगूया.

**अविनाश हळबे**

# लघु कथा :
# तो नक्की आहे का?

टिप : सदर कथा ही संपूर्णपणे काल्पनिक असून, याचा कोणत्याही जीवित वा मृत व्यक्तीशी संबंध नाही.

पहाटेचा बोचरा वारा अंगाला नुसता झोंबत होता. नुकताच पूर ओसरल्यामुळे गावगाडा हळूहळू जागेवर येत होता.

पहाटे ४:३० च्या सुमारास, डॉक्टर साहेबांना हाका मारत नीलकंठ प्राथमिक आरोग्य केंद्राकडे धावत आला.

केंद्रातील डॉक्टर राकेश यांना नुकताच डोळा लागत होता, नीलकंठचा आवाज ऐकून डॉक्टर बाहेर आले.

नीलकंठ धापा टाकतच म्हणाला, ''सरपंचांना छातीत दुखतंय, लै त्रास होतोय जरा येताव का?''

डॉ. राकेशने तात्काळ आपली बॅग उचलली आणि सरपंचांच्या घरी पोहोचले, तपासणी करताना लक्षात आले की हा सौम्य हृदयविकाराचा झटका आहे.

अश्या रुग्णांना आवश्यक सुविधा केंद्रात उपलब्ध नव्हती, आणि तालुक्याहुन ॲम्ब्युलन्स वेळेत पोहोचण्याची शक्यता पण कमी होती.. त्यांनी सांगितले की;

''मोठ्या गाडीची सोय करा... तालुक्याला न्यावे लागेल.''

खरं तर हे सांगितल्यावर स्वतः डॉक्टरांनाच कसे तरी वाटले; कारण पुरात गावातल्या बहुतेक गाड्या खराब झाल्या होत्या... नाही म्हणायला रंगराव देशमुखांची गाडी तेव्हढी वाचली होती.... पण रंगराव आणि सरपंच यांचे हाडवैर सगळ्या गावाला ठाऊक होती पण तरीही नीलकंठ धावला, रंगरावाने देखील मागच्या गोष्टी सोडून देऊन लगेचच आपल्या गड्याला गाडी घेऊन पाठवले.

डॉ. राकेश गाडीत बसल्यानंतर विचार करत होते की; ''रंगराव आणि सरपंच दोघेही गावासाठी गेले कित्येक दिवस राबत होते... दोघांच्यात वैर असून देखील खांद्याला खांदा लावून, पुरातून गाव वाचवत होते... हेच खरे राजकारण आणि समाजकारण, नाहीतर काही काही लोकं आपल्या गावाचे हित कश्यात आहे? याचा विचार न करता केवळ आपल्या स्वार्थासाठी भांडत बसतात....'' एवढ्यात अचानक गाडी थांबली आणि डॉक्टरांची विचार शृंखला थांबली...

''काय झाले महादू ?'' डॉक्टरांनी विचारले...

''काय कळेना बगा पण गाडी एकदम बंदच पडली.... चालू बी होईना...''

डॉक्टर राकेशची काळजी वाढली, सरपंचांना वेळीच उपचार नाही मिळाले तर त्यांच्या जीवावर बेतू शकत होते....

''थांबा, हितच बजरंग ग्यारेज हाये, त्याला बोलिवतो...'' महादू म्हणाला...

धावतच तो बजरंग ग्यारेजकडे धावला ..... पुरात खराब झालेल्या गाड्या रात्रभर दुरुस्त करून हणमंता म्हणजेच त्या बजरंग ग्यारेज चा मालक दमून भागून पहुडला होता. महादुने त्याला उठवले आणि म्हणाला, ''गाडी बंद पडलीये''

हणमंता त्या महादुला बघून जरा चिडूनच म्हणाला, ''काय रं म्हाद्या आर काय येळ काळ हाय का नाही ? .... सकाळी ये गाडीचे काम करू... अंग लै दुखतंय माज''

महादू म्हणाला;

''आर गाडीत सरपंच हायेत त्यांना तालुक्याला नेतुया दवाखान्यात... डॉक्टर सायेब बी हायेत गाडीत. जरा बग की''

खुद्द डॉक्टर सरपंचाला रंगरावांच्या गाडीतून नेतायत म्हणजे मामला गंभीर आहे त्याने ओळखले, आपली हत्यारांची पिशवी घेऊन तो निघाला...

थोड्यावेळ झटापट करून हणमंत म्हणाला, ''म्हाद्या मार स्टार्टर... आणि गाडी सुरु झाली...''

डॉक्टरांनी खिशाकडे हात नेला तसा हणमंत म्हणाला ''सायेब आधी तालुका गाठा पैश्याचं बघू नंतर जाऊ द्या गाडी.''

डॉ. राकेशने अभिवादन करण्यासाठी त्याचे हात हातात घेतले तेंव्हा त्यांना कळले हणमंता स्वतः तापाने फणफणतोय..

गाडीतून आपल्या बॅग मधून त्यांनी गोळ्या काढल्या आणि म्हणाले, ''तीन डोस घे बरे वाटेल.''

मग लगबग करून सरपंचांना घेऊन गाडी पुढे निघाली....

काही दिवसांनी सगळे ठीकठाक झाल्यावर सरपंचानी डॉक्टर, रंगराव, महादू आणि हणमंत यांना वाड्यावर बोलावलं.... हणमंत जरा उशिराने आला त्याच्या हातात कसला तरी पुडा होता...

डॉक्टर म्हणाले, 'काय हणमंता बरायस ना ?''

''व्हय जी ! हे घ्या येशीच्या मारुतीचा परसाद ... शनवार हाय ना आज''हणमंता म्हणाला.

डॉक्टर म्हणाले, ''अरे मी देव, प्रसाद वगैरे काही मानत नाही माहितीये ना ! संकटात धावून येणारा तुझ्या सारखा माणूस हाच माझ्यासाठी देव.''

''त्ये तुमच्या सारख्या शिकलेल्या लोकांसारखं आपल्याला काय कळत नाही बगा, पण एवढं मात्र ठावं हाय की त्या दिवशी तुमची गाडी झटक्यात सुरु करण्यासाठी बुद्धी आणि शक्ती मला आमच्या मारुतीरायांनीच म्हणजेच देवाने दिली'',

''भांडण इसरून आपली गाडी द्यायची रंगरावासनी बुद्धी त्या मारुतीनंच, म्हणजेच देवाने दिली'',

''माझ्या ग्यारेज जवळ गाडी बंद पडणं आणि माझं तिथं असणे ही योजना त्या मारुतीरायचीच, म्हणजेच देवाचीच...''

**''म्हणून म्हणतो माणसात देव नक्की बघा; पण त्या माणसाला देव बनायची बुद्धी देणाऱ्या भगवंताला इसरू नका** .... काय चुकलं असलं तर जोड्यानी हाना...''

हणमंताचे हे बोलणे ऐकून डॉक्टर निशब्द झाले आणि काही क्षण थांबून म्हणाले....

''दे तो प्रसाद.... आज तू मला नवी जाग आणलीस...''

**सत्कर्माची बुद्धी देणारा ''तो म्हणजेच देव नक्कीच आहे'' ; फक्त त्याची अनुभूती घेता आली पाहिजे.**

**श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈



## १ मे
## महाराष्ट्र दिन/ कामगार दिन


आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...
चारचाकी...
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
जनसेवा कर्ज !
TUCSON
आपल्या आवडत्या
टू व्हिलरसाठी
किफायती
कर्ज फक्त जनसेवेचे !
स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास
जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर !
करा जगाची सफर !
जनसेवा आहे हमसफर !
जनसेवा पर्यटन कर्ज
• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी
संपर्क : 8485871252
www.janasevabankpune.net
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

वार्षिक वर्गणी रु. २००/- फक्त
Date of Publication : 26/04/2026 and
Date of Posting : 28/04/2026 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध
(मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे 'हिंदुबोध'.

● मासिक मुल्य रु. २०/- ● वार्षिक वर्गणी रु. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## ❊ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ❊

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | | | |
|---|---|---|---|
| रंगीत पूर्ण पान रु. १.५ लाख | साधे पान रु. १ लाख | साधे अर्धे पान रु. ५०,०००/- | साधे १/४ पान रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान रु. १२,०००/- | साधे १/१६ पान रु. ६,०००/- | सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) रु. २,१००/- | |
| हिंदुबोध अंक मुल्य रु. २०/- | वार्षिक वर्गणी रु. २००/- | त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/- | |

## ❊ हिंदुबोधची वर्गणी ❊

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

हिंदुबोध
व्दारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१